# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 03.08.2012 (का.प.क्र.8) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक 03.08.2012 (का.प.क्र.8) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त, श्री.पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से, प्र.नगर सचिव तथा विधी सहाय्यक श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
03. स. श्री.आगा खान मिया खान
04. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
07. स. श्री. खान अक्रम करीम खान
08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
09. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
10. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
11. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

श्री.रेणुकादास वैद्य :समांतर जलवाहीनी भुसंपासदनासाठी सुमारे 38 कोटी रूपये खर्च येणार होता परंतु मा.सार्वजनिक बांधकाम आणि पर्यटन मंत्री श्री.छगन भुजबळजी, मा.खासदार, श्री.चंद्रकांतजी खैरे, मा.जिल्हाधिकारी, या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेचे 38 कोटी रूपये वाचतील आणि रस्त्याच्या लगत समांतर जलवाहिनी टाकण्याची परवानगी मिळाली. असे वृत्तपत्राच्या माध्यमातून माहिती मिळाली आहे त्यामुळे या सर्वांचे मनापासून अभिनंदन करण्यात येते. तसेच महापालिकेचे मा.आयुक्त, कार्यकारी अभियंता श्री.पानझडे यांचेही अभिनंदन करण्यात येते. स्थायी समितीने अशा पध्दतीचा ठराव पारित करून संबधीत पाचही व्यक्तींना कळविण्याची विनंती आहे. या संबधी शासनास कळविण्यात यावे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(पा/पू) :समांतर जलवाहिनीमध्ये सर्वात मोठा जो कंम्पोनंन्ट होता तो जायकवाडी धरणापासून फारोळयापर्यंत आणि फारोळयापासून नक्षत्रवाडीपर्यंत 2000 मी.व्यासाची जलवाहीनी टाकायची आहे. त्यासाठी साधारणत: 4 1/2 मीटर रूंदिची जागा भुसंपादाचे प्रपोजल तयार केले होते. त्यासाठी विशेष भुसंपादन अधिकारी यांची नेमणुक

देखील झालेली होती. जिल्हाधिकारी कार्यालयात यासाठी रूपये 2,3 कोटी अगाऊ रक्क्म भरणा केलेली होती. भुसंपादनाची प्रक्रीया किचकट असल्यामुळे भुसंपादनासाठी वेळ लागु शकतो. दोन ते अडीच वर्ष भुसंपादनासाठी लागण्याची शक्यता होती. असे लक्षात आले. त्यामुळे प्रशासनाकडुन प्रयत्न केले गेले की, पीडब्ल्युडी कडुन राईट ऑफ वे (ROW) घ्यायचा. पीडब्ल्युडीचा 30 मीटरचा रूंदिचा एक्स्ट्रीम ऐजच्या लगत 1 मीटर जमीनीच्या खाली लाईन टाकण्याची परवानगी देण्यात यावी. अशा प्रकारचे प्रपोजल पीडब्ल्युडीकडे दाखल केले आणि त्यांनी शिफारस करून शासनाकडे पाठविण्यात आले. शासनाने ते मंजूर केले आहे. भूसंपादनाची गरज आता भासणार नाही. 75 लाख रूपये 25 वर्षासाठी डिपॉजिट ठेवणार आहे विथ इन्ट्रेस 25 वर्षानंतर परत मिळणार आहे. काही दुरूस्त्या वगैरे राहील्यास ते त्यातून कापु शकतात.

श्री.रेणुकादास वैद्य :अभिनंदन करण्यात येते.

श्री.बाळासाहेब मुंडे :अभिनंदन करण्यात येते लवकारात लवकर शहराला पाणीपुरवठा करण्यात यावा.

मा.सभापती :समांतर जलवाहीचा मोठा प्रकल्प शहरात राबविण्यात येत आहे. प्रकल्प राबवित असतांना जी जागा उपलब्ध करून घ्यावयाची होती. भुसंपादनासाठी मोठया निधीची आवश्यकता लागणार होती. शेतकऱ्यांकडून जमीन भुसंपादन करण्यासाठी अवघड झाले असते. 18 गावांचा प्रश्न होता. 18 हेक्टर जमीन 4.5 रूंदिची जागा महापालिकेला जलवाहिनी टाकण्यासाठी लागणार होती. सर्व पदाधिकारी मिळुन सन्मानिय नामदार श्री.छगन भुजबळजी यांना भेटुन विनंती करण्यात आली. महानगरपालिकेच्या हिताचे मोठे काम आज झ ाालेले आहे. सन्माननिय नामदार श्री.छगन भुजबळ साहेब यांचे सभागृहातर्फे धन्यवाद मानुन अभिनंदन करण्यात येते. मा.खासदार, श्री.चंद्रकांतजी खैरे साहेब यांचे या शहरात 2024 पर्यंत 24X7 या प्रकारे जी प्लॅनिंग केलेली आहे. यासाठी त्यांचेही मन:पुर्वक धन्यवाद व आभार. मा.आयुक्त, मा.जिल्हाधिकारी, यांचेही अभिनंदन करण्यात येते. तसेच कार्यकारी अभियंता श्री.पानझडे यांचे सहकारी अधिकारी/कर्मचारी यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते. अभिनंदनाचे पत्र सभागृहातर्फे सर्वांना पाठविण्यात यावे. सर्वांचे मन:पुर्वक धन्यवाद.

श्री.नारायण कुचे : गॅस्ट्रो बाबत पेपरमध्ये बातम्या येत आहेत. आरोग्य विभागामार्फत धुर फवारणी केली जाते का? याबाबतीच्या यंत्रणेबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :फॉगींग मशीन, शहरात किती कर्मचारी काम करतात. यंत्रणा कशी आहे. याबाबत संबंधीतांनी खुलासा करावा.

बायोलॉजिस्ट :महानगरपालिकेकडे 64 पंप आहेत 147 फॉगीग मशीन, टॅक्टरवरील 2 मशीन आहेत. दोन व्हेईकल माऊंटन पैकी एक वार्ड अ ते क आणि दुसरी ड ते फ मध्ये कार्यरत आहेत.

श्री.बाळासाहेब मुंडे :वार्डामध्ये फॉगीग किती दिवसाला करायला पाहिजे.

**बायोलॉजिस्ट** :फॉगीग फक्त दोन टक्के आहे. ज्या ठिकाणी साथरोग आहे त्या ठिकाणी फॉगीग केली जाते. वैद्यकीय अधिकारी यांचेकडुन माहिती आल्यानंतर फॉगींग केली जाते.

**मा.सभापती** :महिण्याभरात किती माहिती आल्यात.

**बायोलॉजिस्ट** :महिण्याभरात 5 ठिकाणची माहिती आलेली आहे. या व्यतिरिक्त दुसऱ्या
ठिकाणी फॉगीग केलेली आहे.

**मा.सभापती** :64 हॅन्डपंप वापरकरण्यासाठी किती कर्मचारी कार्यरत आहे व 64 पंप रोज ऑपरेट होतात का?

**बायोलॉजिस्ट** :82 कर्मचारी कार्यरत आहेत. 50 पंप रोज ऑपरेट होतात. प्रत्येक वार्डासाठी एक कर्मचारी देण्यात आलेला आहे.

**मा.सभापती** :स.नगरसेवकांना भेटुन कर्मचारी स्वाक्षरी आणातात का? त्यांच्या सहया असतात का? असेल तर त्यांची नांव काय आहेत?

**बायोलॉजिस्ट** :तशा प्रकारचे आदेश त्यांना देण्यात आलेले आहेत. बऱ्याच नगर सेवकांची स्वाक्षरी घेतली जाते.

**मा.सभापती** :स.नगरसेवकांची नियमित स्वाक्षरी घेण्यात यावी. कर्मचारी किती तास काम करतात.

**बायोलॉजिस्ट** :7 तास काम करण्याचे बंधनकारक आहे परंतु 7 तास काम करत नाही.

**श्री.नारायण कुचे** : कोणत्या आरोग्य केंद्रात टॅक्टर गेले. तुम्ही जेथे टॅक्टर सांगतात तेथे ते नेतात का? टॅक्टर जे लावण्यात आलेले आहे त्याचा रेट 1800 रूपये रोज आहे. आठवडयातुन एक वेळेस टॅक्टर येते. तपासणी कुठे झाली. डेंग्यूची साथ आहे का? खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती** :प्रत्यक्ष भेट देण्यात आलेली आहे काय?

**बायोलॉजिस्ट** :प्रत्यक्ष भेट देण्यात आलेली आहे.

**मा.सभापती** :श्री.बेग आपली जबाबदारी आहे का? किती सुपरवाईझर आहेत?

**बायोलॉजिस्ट** :11 आहेत.

**मा.सभापती** :फक्त 2 तासापेक्षा जास्त काम करित नाहीत. 10 नंतर काम करित नाहीत. हजेऱ्या घेतात का?

**श्री.बाळासाहेब मुंडे** :संबधीत अधिकारी खोटी माहिती देत आहेत.

**मा.सभापती** :मुंडे साहेबांच्या वार्डात कोण मजूर आहे ?

**श्री.बाळासाहेब मुंडे** :कुणी येत नाही. वार्डात कोण येते त्यांचे नांव माहित आहे का?

**मा.सभापती** :बेग साहेब सुपरव्हिजन नाही.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :सभागृहात सत्यता सांगावी.

**मा.सभापती** :माझ्या वार्डात केव्हा आले.

**बायोलॉजिस्ट** :आलेलो आहे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :जेथे डेंग्यूची रूग्ण सापडले त्यामुळे तेथे आलेत.मी. फोन केला त्यावेळी तेथे आहे. प्रत्येक वार्डात यासाठी माणूस आहेत का?

**मा.सभापती** :11 सुपवाईझर कार्यरत असुन प्रशासनाने त्यांचेकडुन अहवाल मागविण्यात यावा. कर्मचारी सकाळी 8 ते 10 वाजेपर्यंत कार्यरत असुन त्यानंतर प्रशासन त्यांचेकडुन कुठलेच काम करून घेतले जात नाही. संबधीतांची हजेरी कुणामार्फत येते.

| | |
|---|---|
| बायोलॉजीस्ट | :एस.एफ.डब्ल्यु. यांचेमार्फत कर्मचाऱ्यांची हजेरी घेण्यात येते. |
| मा.सभापती | :कर्मचाऱ्यांवर प्रशासनाचे नियंत्रण नाही. सभागृहात चुकीची माहिती का देता. यापुढे सुधारणा करण्यात यावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :वार्डात सहा नाले असुन माझ्या वार्डात ट्रॅक्टर आल्याबाबत माहिती नाही. चार ट्रॅक्टर असुन 84 कर्मचारी, 64 हातपंप कार्यरत असुन प्रत्येक नगरसेवकांच्या वार्डात एक कर्मचारी देण्यात येऊ शकते. यांचेवर योग्य देखरेख ठेवुन योग्य रितीने नियोजन करण्यात यावे. |
| श्री.समीर राजुरकर | :नियोजन व्यवस्थितरित्या करण्यात यावे. कर्मचारी 8 10 दिवसातून एकदा येतात. सदस्यांची भेट घेऊन त्यांची सही शिक्का घ्यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :महानगरपालिकेचे लाखो रूपये या यंत्रणेवर खर्च होत आहे. अयोग्य नियोजनाअभावी कार्यक्षमरित्या यंत्रणा कार्यान्विय करता येत नाही. कर्मचारी केव्हा ही येतात केंव्हाही जातात. त्यांना देणे घेणे नाही. मा.आयुक्त साहेबांनी नियंत्रण केले तर बरे होईल. |
| मा.सभापती | :11 सुपरवाइझरने प्रत्येक नगरसेवकांना भेटुन कर्मचारी आल्याबाबत खात्री केली पाहिजे. कर्मचाऱ्यांचे योग्य नियोजन करण्यात येवुन सुपरवाईझरच्या नियंत्रणात कोणते वार्ड आहे त्यांचा मोबाईल क्रमांकसह माहिती स.सदस्यांना त्यांची नांवे देण्यात यावी. सर्व स.सदस्यांना याबाबतची माहिती देण्यात यावी. औषधाबाबत शासनाकडे पत्रव्यवहार केलेला आहे का? आपल्या स्तरावर खर्च करता येईल का? हे सुध्दा पाहण्यात यावे. |
| बायोलॉजिस्ट | :प्रत्यक्ष जाऊन आलेलो आहे. औषध खरेदीची प्रक्रीया चालू आहे. अगोदर आपल्यास्तरावर औषध खरेदी करण्यात यावे असे सांगण्यात आले आहे. |
| श्री.समीर राजुरकर | :दोन बैठकीपुर्वी ॲक्शन पॉईंटबाबत खुलासा घेण्यात यावा. सेव्हन हिल उड्डाणपुलवर लाईटबाबत खुलासा करण्यात यावा. |
| कार्य.अभियंता (विद्युत) | :आणखी चार दिवसांचा अवधी लागणार आहे. |
| प्र.विधी सल्लागार | :स.सदस्यांनी ज्या प्रकरणाविषयी माहिती विचारलेली आहे त्याबाबतीत प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. त्यामध्ये महानगरपालिकेने जबाब दाखल केलेला आहे. जैसे थे चा आदेश मा.न्यायालयाने दिलेला आहे. प्रकरण दि.04.08.12 रोजी ठेवण्यात आलेले आहे. त्यानंतरची माहिती प्रशासनास, सभागृहास देण्यात येईल. |
| श्री.समिर राजुरकर | :जैसे थे आदेश असतांना त्या ठिकाणी आतमध्ये फर्निचरचे, पीओपी, लाईट फिटींगचे काम चालू आहे. मा.आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार त्रिसदस्यीय समिती त्या ठिकाणी गेली असता संबधीताने मा.न्यायालयात दाखल केले की, जैसे थे परिस्थिती असतांना महानगरपालिका सदरील बांधकामामध्ये हस्तक्षेप करीत आहे. त्या ठिकाणी बांधकाम होत आहे त्याबाबतचे फोटोग्राफ आहेत.<br>(सभागृहात मा.सभापती यांचेकडे स.सदस्य श्री.समिर राजुरकर सदर जागेवर चालु असलेले बांधकामाबाबचे फोटो सादर करतात)<br>महाराष्ट्रात इमारत निरीक्षक ही जी यंत्रणा नाही. जवान एस.आय ला रिपोर्टींग करतो. एस.आय. अतिक्रमण प्रमुख यांना दररोज पत्र देत |

असतात की एवढे बांधकाम चालु आहे. परवानगी तपासण्यात यावी. या महानगरपालिकेतील इमारत निरीक्षक अतिक्रमण विभाग प्रमुख, प्रशासकीय अधिकारी यांना काम करू देणार नाहीत. सर्व यंत्रणा विस्कळीत करून शहर वाढत जाणार. महापालिकेची 15000 स्के.फुट जागा असुन त्या प्रकरणात मनपालिकेची भिंत पाडली. रस्ता द्या म्हणुन मागणी आहे. सप्टेंबर 2010 पासून मा.न्यायालयात वाद सुरू आहे,याबाबतीत तोडगा काढावा लागणार आहे नसता येत्या पाच वर्षात गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल.

श्री.नारायण कुचे :बांधकाम पाडण्यासाठी जैसे थे आदेश आहे. आतमध्ये बांधकाम करण्यासाठी परवानगी आहे का?

श्री.समिर राजुरकर :त्रिसदस्यीय समितीमध्ये कोण होते? बांधकामाचे त्यावेळची स्थिती व आत्ताची स्थितीमध्ये 40 टक्क्यांचा फरक झालेला आहे.

मा.आयुक्त :त्रिसदस्यीय कमिटीने सदरील बांधकामाच्या ठिकाणी जाऊन पहाणी करण्यात यावी. बांधकाम चालू असल्यास फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग करून मा.न्यायालयाच्या निर्दशनास आणुन देण्यात यावे.

श्री.नारायण कुचे :उड्डाणपुलाच्या बाजुला चालु असलेल्या बांधकामाचे पिआर कार्ड रद्द झालेले आहे. त्या ठिकाणी सहाव्या मजल्याचे काम सुरू आहे.

मा.सभापती :महानगरपालिका म्हणून आपला काय निर्णय राहणार आहे. एमआरटीपी ॲक्ट कलम 53 प्रमाणे कारवाई केव्हा करणार.

सहा.संचालक न.र. :अहवाल दिल्याप्रमाणे पिआर कार्ड रद्द झालेले आहे. बांधकाम परवानगीची मुदत संपल्यामुळे बांधकाम लाइव नाही. त्यामुळे त्याने बांधकाम परवानगी रद्द झाल्यानंतर केलेले काम हे अनाधिकृत ठरते. यावर प्रशासकीय अधिकारी यांनी योग्य ती कारवाई करण्यास हरकत नाही.

श्री.शेख अब्दुल असद :सेव्हन हिल येथील तार कंम्पाउड च्या बांधकामाबाबत माहिती देण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी :कारवाई करण्यात आलेली आहे. पत्र्याचे शेड काढण्यात आलेले आहे. पुन्हा स्थळ पहाणी करून कारवाई करण्यात येईल.

मा.सभापती :आजही बांधकाम चालू आहे.

सहा.संचालक न.र. :बांधकाम परवानगी संपलेली असल्याने यापुढे केलेले बांधकाम हे अनाधिकृत आहे.

मा.सभापती :चालू असलेले बांधकाम थांबविण्यात यावे.

प्रशासकीय अधिकारी :सेव्हनहिल येथील बांधकाम निष्कासित केलेले आहे. परवानगी नसल्याने पत्र्याचे शेड काढण्यात आलेले आहे.

विधी सल्लागार :स.सदस्यांनी मा.न्यायालयाची प्रत दिलेली आहे. या आदेशाचे अवलोकन केले असता दावा क्रमांक 734/2011 नवाब विरूध्द मनोज बाकलीवाल यांचेमधील न्यायप्रविष्ट प्रकरण आहे. यामध्ये मा.न्यायालयाचे आदेश दिनांक 22.5.2012 रोजी पारित झालेले आहे. सदरील प्रकरण आपआपसातील आहे. महानगरपालिका पार्टी नाही. दोन्ही पार्टीने जैसे थे आदेश कायम ठेवावे. जरी याच्यामध्ये मनाई हुकूम दिलेला नसला तरी प्रतिवादी बाकलीवाल यांनी बांधकाम करू नये आणि मा.न्यायालयाची परवानगी शिवाय बांधकाम करू नये. असे

आदेशित केलेले आहे. त्यामुळे त्याने तिथे बांधकाम करणे उचित होणार नाही.

श्री.शेख अब्दुल असद :सध्या त्या ठिकाणी काम चालू आहे.

मा.सभापती :तात्काळ प्रशासनाने सेव्हन हिल, चिकलठाणा येथील बांधकामाबाबत माहिती घेवुन मा.आयुक्तांना व सभागृहाला माहिती देण्यात यावी.

श्री.विजेंद्र जाधव :एलबीटीबाबतची माहिती मिळालेली नाही. कंपन्यांची नांवे देण्यात आलेली आहे कंपनी किती एलबीटी भरतात याबाबत माहिती हवी आहे.

मा.सभापती :आरटीआय अधिनियम अन्वये माहिती देण्याचे अधिकार मा.आयुक्तांना प्रदान केलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :प्रशासनाने नियमानुसार खुलासा करावा.

स्था.सं.कर अधिकारी (श्री.पाटणी):स्थानिक संस्था कराचा भरणा व्यापारी करतात सेल्स टॅक्स याप्रमाणे आहे. वैयक्तिक माहिती उघड करण्याचा अधिकार राखीव ठेवण्यात आलेला आहे. अधिनियमानुसार वैयक्तिक माहिती उघड झाल्यास त्याच्या जिवीतास धोका पोहचु शकेल ब्लॅकमेलिंगचा प्रकार त्यामध्ये घडु शकतो. नियम 52 मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी कोणत्याही व्यापाराचे अथवा इतर व्यक्तीचे नांवे आणि अशा व्यापाऱ्याच्या किंवा इतर व्यक्तीचे नांवे संबधात या नियमान्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाहीशी संबधीत जर कोणताही तपशिल प्रसिध्द करणे किंवा उघड करणे किंवा लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे. असे आयुक्तांचे मत असेल तर अशी नांवे आणि तपशिल त्याला योग्य वाटेल अशा रितीने उघड किंवा प्रसिध्द करता येईल किंवा उघड करण्याची व्यवस्था करता येईल.

मा.सभापती :याबाबतीत संबधीतास योग्य तो निर्णय घेवुन स.सदस्यांना कळविण्यात यावे. बायजीपुरा येथील अतिक्रमणच्या बाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.समीर राजुरकर :प्रशासनाची इच्छा असली तरीही इमारत निरीक्षकाने सांगीतल्यानुसार कार्यवाही होत असते. ज्या ठिकाणी स्टे आहे तेथे कार्यवाही संबधी सांगीतले जाते. बी.आय नावाच्या प्रोडक्टला काही दिवसांसाठी लिटमस टेस्ट म्हणुन बाजुला काढले पाहिजे. दुसरी व्यवस्था करायला पाहिजे. नोडल ऑफिसर म्हणुन प्रशासकीय अधिकाऱ्यास सभागृहास खुलासा करावा लागतो परंतु बीआय हे प्रशासनास पुर्णपणे मीसगाईड करत असतात.

मा.आयुक्त :कमिटी जी प्रत्यक्ष गेली त्यामध्ये श्री.सुर्यवंशी आपण होतात का? तेथे पाहणी करून त्याची माहिती कोर्टात सादर करावी.

श्री.नारायण कुचे :पी.आर.कार्ड रद्द झाल्यावर तेथे 6 मजल्याचे बांधकाम चालू आहे.

मा.सभापती :आजपर्यंत MRTP 51,52 प्रमाणे काय कार्यवाही करण्यांत यावी.

सहा.सं.न.र :अहवाल दिल्याप्रमाणे पी.आर.कार्ड रद्द झाले आहे. पी.आर.कार्ड रद्द झाल्यानंतर कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

श्री.अक्रम खॉन :सेव्हनहील कंम्पाऊड वॉलचे कोर्ट मॅटर चालू आहे त्याचे काय झाले. खुलासा करावा.

श्री.सुर्यवंशी :कारवाई करण्यात येत आहे.

मा.सभापती :उड्डाणपुलाबाबत श्री.कुचे साहेबांनी जे सांगीतले त्यांची पहाणी करून घ्यावी. सद्या काम चालू आहे.

सहा.सं.न.र. :पी.आर.कार्ड रद्द झाले पुढे कार्यवाही नियमाप्रमाणे करण्यात येईल.

मा.सभापती :प्रशासकीय अधिकारी यांनी तेथील पुढील होणारे काम थांबवावे

श्री.समीर राजुरकर :मा.सभापती, मा.आयुक्तांना विनंती आहे की, बी.आय. यांना निर्देश द्यावेत ते डीस्ट्रर्ब करतात.

मा.सभापती :रॉडिंग मशिन खरेदीच्या अहवालाबाबत खुलासा करावा.

शहर अभियंता :अहवालाबाबत कार्यवाही सुरू आहे. काही दिवसांची मुदत देण्यात यावी.

मा.सभापती :मुदत देण्यात येते.पेट्रोल पंपच्या जीआरबाबत माहिती घेण्यात आली आहे का?

स्था.सं.कर अधिकारी (श्री.पाटणी):बृहन्मुंबई,ठाणे आणि नवि मुंबई येथे पेट्रोल आणि डिझेलवर 1 आणि 3 टक्के व्हॅट लावण्यात आलेला आहे. याबाबत याठिकाणी विचारणा करण्यात आलेली आहे. सेल्स टॅक्स ऑफिस यांनाही पुरेशी माहिती उपलब्ध नाही. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय यांना याबाबत माहितीची विचारणा केलेली आहे.

मा.सभापती :रोहिदासपुरा डांबरीकरणा विषयी खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता :संबधीत कंत्रादारास काम करण्याबाबत पत्र देण्यात आलेले आहे. बील अदा करण्यात आलेले नाही. ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यासाठी कार्यवाही करण्यात आलेली आहे. पेमेंट देण्यात येणार नाही. काम करून घेण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :स्थायी समितीमध्ये प्रश्न विचारणा करून माहिती मागवु शकतो

प्र.नगर सचिव :प्रश्न विचारून माहिती विचारता येईल.

श्री.समीर राजुरकर :सुराणानगर वार्डात एमजीएमकडुन येणारा नाला आहे. त्या ठिकाणी वळण आहे नालाचा आता नाली शिल्लक राहिलेली आहे. 10 वर्षापुर्वी त्या ठिकाणी नाला होता. प्रत्यक्ष सदस्य,मा.आयुक्त व प्रशासनातील अधिकारी यांनी भेट देवुन अहवाल तयार करण्यात यावा. नाला आता लुप्त झालेला असुन त्या ठिकाणी प्लॉटींग सुरू आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :पहिला पाऊस पडल्यानंतर पुर्ण नाल्यांची पहाणी केली. नाल्यावरील अतिक्रमणबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली.

मा.आयुक्त :नाल्यावरील अतिक्रमण हा शहरातील मोठा विषय आहे. जो पर्यंत सर्वे पुर्ण होत नाही. तो पर्यंत नेमक कोणाचे अतिक्रमण आहे. हे कळणार नाही. चुकीचे पिआरकार्ड तयार करण्यात आलेले आहेत. रेकॉर्ड जोपर्यंत महानगरपालिकेकडे येत नाही. तो पर्यंत कायदेशिर कारवाई करता येत नाही. म्हणुन सिटी सर्वेला हाताशी धरुन शहरातील नाल्याचे सर्वे करण्याचे ठरविलेले आहे. 15 ऑगष्टपर्यंत सर्वे पुर्ण करण्यासाठी सहा नाल्यांसाठी 20 लाख रूपये देण्यात आलेले आहे. सिटी सर्वेचे आयुक्त श्री.चंद्रकांत दळवी यांचेबरोबर या संदर्भात पाठपुरावा सुरू आहे. त्यांनी डेप्टी डायरेक्टर यांना सूचना केलेल्या आहेत. इतर नाल्यांचाही सर्वे करून देणार आहेत. त्यांचेकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. खाजगी यंत्रणेकडुन हे काम करून घेणार आहेत. अंतिमकरण सिटी सर्वेचे अधिकारी/कर्मचारी करतात. सर्व नाल्यांचा

सर्वे झाल्यानंतर किती मालमत्ता अतिक्रमणामध्ये येतात. याची माहिति होईल. याचा कार्यक्रम सुरू झालेला आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :वार्डातील नाल्यामध्ये खुले ड्रेनेज लाईन वाहत आहे.

मा.आयुक्त :सर्वे झाला नाही म्हणुन काम करता आले नाही. या कामासठी 2 लाख रूपये अभियंत्याना देण्यात आले होते. शहर अभियंता यांनी या संदर्भात पाठपुरावा करावा.

मा.सभापती :सर्वे/मार्कींग करून नाल्यावरील अतिक्रमण काढण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :एमआयटी कॉलेज समोर टोलेजंग इमारतीचे बांधकाम चालू आहे. मनपाच्या हद्दीत मनपाच्या शैक्षणिक झोनमध्ये बांधकाम चालू आहे. मा.न्यायालयाचा मतदार यादीचा आधार घेवुन ग्रामपंचायतीचा आधार घेवुन काम चालू आहे.

मा.सभापती :मनपाच्या शैक्षणिक झोनमध्ये बांधकाम चालू आहे. मनपाच्या डिपी प्लॅनबाबत खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र. :गट क्रमांक 55 मनपाच्य हद्दीमध्ये आहे. त्या ठिकाणी कुठलीही बांधकाम परवानगी दिलेली नाही.

श्री.समीर राजुरकर :यास जबाबदार बीआय आहे. या सर्व कॅन्सरचे मुळ बी आय आहे.

मा.आयुक्त :अतिक्रमण काढण्यासाठी यंत्रणा कुचकामी पडत आहे. प्रत्येक निवडणूक वार्डासाठी बिट मार्शल तयार करण्यात आलेला आहे. 99 वार्डासाठी 99 अधिकारी/कर्मचारी यांचे नेमणुका केलेल्या आहेत. रोजचा रिपोर्ट देणे अपेक्षित आहे. जवानच्या माध्यमातुन इमारत निरीक्षक, आणि वार्ड अधिकारी यांना आणि वार्ड अधिकारी यांनी प्रशासकीय अधिकारी यांना अहवाल देण्यात यावा. उपआयुक्त सिडको मार्फत आयुक्तांकडे अहवाल देण्यात यावा. अतिक्रमण काढण्यासंदर्भात तातडीने कारवाई केली जावी. सदरील सिस्टीम पुन्हा कार्यन्वित करण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :बीट मार्शलला बीआय काम करू देणार नाही. पुर्वी अशीच सिस्टीम होती. बीआयची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. एक महिण्यात रिझल्ट दिसेल.

मा.सभापती :मोठया बांधकामाकडे बीआय लक्ष देणार नाही. छोटया बांधकामावर ताबडतोब कारवाई करण्यात येते.अनाधिकृत बांधकाम झाल्यानंतर मनपाला त्यांना सुविधा द्यावी लागते. याबाबत प्रशासनाने लक्ष घालावे.

श्री.बाळासाहेब मुंडे :प्रशासनाने पाठविले म्हणुन सांगण्यात येत नाही. नगर सेवकांनी पाठविले म्हणुन सांगण्यात येते.

श्री.समीर राजुरकर :बीआय यांनी रिपोर्ट दिल्यानंतरसुध्दा विभाग प्रमुख यांनी 15 -15 दिवस संचिका दाबुन ठेवलेल्या आहेत.

श्री. आगा खान मिया खान :परीमल हॉ.सोसायटी प्रकरणाबाबत मा.न्यायालयाचा निर्णय आहे. मनपा प्रशासनाने अतिक्रमण काढण्यासाठी पुरेसे पोलिस कर्मचारी देण्याबाबत पोलिस आयुक्तांना पत्र देण्यात आलेले आहे. एका अपंग व्यक्तीचे प्रकरण आहे. भन्साळी आणि खंडेलवाल यांचेतील प्रकरण आहे. भन्साळी यांनी खंडेलवाल यांचे प्लॉटवर अतिक्रमण केलेले आहे. मनपाचा सर्वे झाल्यावर त्यांनी बॉन्डवर लिहुन दिले की 15 दिवसात माझे बांधकाम पाडुन टाकेल. सन 2005 पासून प्रकरण चालू आहे.

महानगरपालिकेचा अहवाल प्राप्त झालेला आहे. महानगरपालिकेने त्यांना कंम्पलिशन सर्टीफिकेट दिलेले आहे. संबधीत अधिकारी यांनी याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता (न.र.वि) :भन्साळी आणि खंडेलवाल यांचे प्रकरणात भन्साळीच्या बांधकामाबाबत खंडेलवाल यांचे अनाधिकृत बांधकामाबाबत तक्रार असायची त्याबाबतची पहाणी करून भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबतची तपासणी करण्यात आली. दंड आकारणी करून नियमित करता येईल का? हे पहाण्यात आले. भन्साळीचे बांधकाम बॉन्ड्रीच्या आत असल्याने मा.आयुक्तांच्या परवानगीने भोगवटा प्रमाणपत्र मान्यता दिलेली आहे. अद्यापपर्यंत भोगवटा प्रमाणपत्र इश्यु केलेले नाही कारण मा.न्यायालयात सदरील प्रकरणाबाबत याचिका दाखल झालेली आहे.

श्री.आगा खान मिया खान : त्यांचेजागेवर बांधकाम झालेले आहे.

उपअभियंता (न.र.वि) :खंडेलवाल यांचे जागेवर बांधकाम झालेले नाही. जे काही बांधकाम झालेले आहे ते भंन्साळी यांचे बॉन्ड्रीवर झालेले आहे.

श्री.आगा खान मिया खान :बॉन्डवर लिहुन दिलेले आहे की, जागेवर बांधकाम झालेले आहे.

मा.सभापती :मा.आयुक्तांसमोर श्री.भन्साळी व श्री.खंडेलवाल यांना सुनावणीसाठी बोलविण्यात यावे.

मा.आयुक्त :सदरील प्रकरण मा.न्यायालयात गेले आहे. भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत विषय समोर होता. अधिकारी यांनी जागेवर जाऊन प्रत्यक्ष पहाणी केली समोरची जी मार्जीन आहे ती जेवढी हवी होती तेवढी नव्हती. काही प्लॉट सरकले, असा पुर्ण लेआऊट सरकला आहे. कोर्ट निकालानंतर कार्यवाही होईल. मा.न्यायालयाचे प्रकरण व खास बाब म्हणुन आयुक्तांच्या खास अधिकारात वि.नि.नियमावली कलम 6.6 नुसार भोगवटा दंड आकारून देण्यात आले. परिमल हॉ.सोसायटीला प्रत्यक्ष भेट देण्यात आलेली आहे. माझ्यासमोर मोजमाप घेण्यात आलेले आहे. सोसायटीच्या सर्व प्लॉटची मोजणी करण्यास सांगीतले आहे काही प्लॉट पुढे सरकलेली आहेत. न्यायालयात प्रकरण असल्याकारणाने भोगवटा प्रमाणपत्र इश्यु केलेले नाही. बांधकामास साईड मार्जिन सोडण्यात आलेले नाही.

मा.सभापती :महानगरपालिकेच्या मालमत्ता मनपाच्या नांवे लावण्यात याव्यात. डॉकेट बनविण्यासाठी संचिका पुटअप करून अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात यावी.जाहिर प्रगटनबाबत मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्य अग्निशमन अधिकारी :शासकीय व खाजगी इमारतींचे फायर ऑडीट करण्याबाबतीत शासनाचे आदेश आहेत शासकीय इमारतींचे फायर ऑडीट करण्यासाठी दोन टिम तयार करण्यात आलेल्या आहेत. खाजगी इमारतींचे फायर ऑडीट करणे बाकी आहे त्यासाठी जाहिर निवेदन देण्यात आलेली आहे. शासनाने फायर ॲक्ट 2009 तयार केलेला आहे त्याची अंमलबजावणी चालु आहे. दर सहा महिण्याला अग्निशमन यंत्रणा अपडेट करून तसा अहवाल अग्निशमन विभागाला द्यावा असे अपेक्षीत आहे. तसा अहवाल दिल्यानंतर पुढे फायर एनओसी पुढे चालु

ठेवता येईल. अशी अट आहे.

मा.सभापती :दररोजची रिनिवल बाबतच्या प्रकरणांची माहिती सभागृहाला/सभापती यांना देण्यात यावे.

विषय क्र. 19 : (विषय क्र. 16 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 27/07/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

मा.सभापती : स्थगीत.

ठराव :

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 20 : (दिनांक 20.06.2012 (का.प. क्र.43 दिनांक 30-5-2012 ची पुढे ढकललेली ) रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार -विषय क्रमांक-768)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विकास आराखड्यानुसार रस्ता रूंदीकरणाचे काम महानगरपालिकेने हाती घेतलेले असून त्यानुसार वार्ड-अ कार्यक्षेत्रातील विकास योजनेनुसार रस्ता रूंदीकरण मोहीमेअंतर्गत विविध रस्त्यावरील बाधीत असलेल्या, पाडण्यात / हटविण्यात आलेल्या इमारतीचा मलबा उचलणे आवश्यक असल्याने व महानगरपालिकेकडे स्वत:चे वाहने तेवढ्या प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे कार्यालयीन दर पत्रक सुचना क्रं./मनपा/यांत्रिकी/शअ/ 660/2011, दिनांक 17/07/2011 अन्वये खालील प्रमाणे दरपत्रके मागविण्यात आली होती. त्या मध्ये

| अ.क्र. | वापरण्यात आलेले यंत्र सामुग्री | प्रती तास | प्रती दिन |
|---|---|---|---|
| 01 | जे.सी.बी. मशीन | 1050/- | -- |
| 02 | पोकलेन मशीन | 2000/- | -- |
| 03 | पोकलेन मशीन शिफटींग चार्जेस | 8500/- | -- |
| 04 | मोठे टिप्पर | -- | 7000/- |
| 05 | छोटे टिप्पर | -- | 3150/- |

दर पत्रके मागवून त्यास खालील प्रमाणे आयुक्त यांनी मंजुरी दिली असुन दिनांक 23.02.2012 चे ज्ञापनाद्वारे रस्त्यावरील मलबा/मटेरिअल रात्र दिवस 24 तास उचलण्याचे काम करून घेण्याचे आदेश दिले आहेत.

सदर मंजुर दरानुसार दिनांक 08/02/2012 पासुन न्यु साधना इंजिनिअरींग वकर्स श्री.प्रभाकर मोहीते आणि श्री.नसीम पटेल यांच्या कडून खालील रस्त्यातील मलबा, व्यर्थ साहित्य इ. उचलण्याचे आणि त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय ते चेलीपुरा चौक ते शाहगंज चमन विकास योजना रस्ता.

- महात्मा गांधी पुतळा शाहगंज ते सिटीचौक ते भडकलगेट विकास योजना रस्ता.
- मनपा मुख्य कार्यालय टाऊन हॉल ते लोटाकारंजा ते चेलीपुरा चौक विकास योजना रस्ता.
- नेहरूभवन ते औरंगपुरा भाजी मंडई विकास योजना रस्ता.
- मकाईगेट ते विद्यापीठ विकास योजना रस्ता.
- पानदरीबा ते सराफा विकास योजना रस्ता.

- **महात्मा गांधी पुतळा शाहगंज ते मंजुरपुरा चौक विकास योजना रस्ता. वरील प्रमाणे रस्त्यावरील मलबा उचलण्यासाठी लावण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीचे विवरण खालील प्रमाण आहे.**

**अ) कंत्राटदाराचे नांव : न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स.**

| अ.क्र. | मशीनचा प्रकार | | संख्या | दर | प्रति दिवस | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | टिप्पर (मोठे) | | 135 | 7000/- | प्रती दिवस | 945000/- |
| 02 | टिप्पर (छोंठे) | | 105 | 3150/- | प्रती दिवस | 330750/- |
| 03 | जेसीबी मशीन | | 72 | 1050/- | प्रती तास | 75600/- |
| 04 | पोकलेन मशीन मशीन) | 02 | 432 | 2000/- | प्रती तास | 864000/- |
| 05 | पोकलेन शिफ्टींग | | 3 | 8500/- | प्रती जॉब | 25500/- |
| | | | | | एकूण रक्कम रू | 22,40,850/- |

**ब) कंत्राटदाराचे नांव : श्री प्रभाकर मोहीते.**

| अ.क्र. | मशीनचा प्रकार | संख्या | दर | प्रति दिवस | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | टिप्पर (मोठे) | 22 | 7000/- | प्रती दिवस | 154000/- |
| 03 | जेसीबी मशीन | 18 | 1050/- | प्रती तास | 18900/- |
| | | | | एकूण रक्कम रू | 1,72,900/- |

**क) कंत्राटदाराचे नांव : श्री नसीम पटेल**

| अ.क्र. | मशीनचा प्रकार | संख्या | दर | प्रति दिवस | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | टिप्पर (मोठे) | 18 | 7000/- | प्रती दिवस | 126000/- |
| | | | | एकूण रक्कम रू | 1,26,000/- |

**दिनांक 08/02/2012 ते दिनांक 15/03/2012 पर्यंत झालेल्या कामाचा खर्च रक्कम रू.25,39,750/- झाले आहे तसेच सध्या देखील रस्त्यावरील मलबा उचलण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यास अपेक्षीत रक्कम रू.10.00 लक्ष अशी एकुण रक्कम रू.35,39,750/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती : मंजूर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विकास आराखड्यानुसार वार्ड-अ कार्यक्षेत्रातील विकास योजनेनुसार रस्ता रूंदीकरण मोहीमेअंतर्गत विविध रस्त्यावरील बाधीत असलेल्या, पाडण्यात / हटविण्यात आलेल्या इमारतीचा मलबा उचलणेकरीता प्राप्त दरपत्रकातील मंजुर दरानुसार दिनांक 08/02/2012 पासुन न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स, श्री.प्रभाकर मोहीते आणि श्री.नसीम पटेल यांच्या कडून रस्त्यातील मलबा, व्यर्थ साहित्य इ. उचलण्याचे आणि त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्याचे कामासाठी प्रस्तावातील (अ), (ब), (क) च्या रकान्यात नमुद केल्याप्रमाणे दिनांक 08/02/2012 ते दिनांक 15/03/2012 पर्यंत झालेल्या कामाचा खर्च रक्कम रू.25,39,750/- उर्वरीत रस्त्यावरील मलबा उचलण्याचे कामाचा अपेक्षीत रक्कम रू.10.00 लक्ष**

अशी एकुण रक्कम रू.35,39,750/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 21 :

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीने तसेच भाडे समितीच्या मान्यतेने सहा.संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.मिसारवाडी येथील बालवाडीसाठी श्री.आर.के. दांडगे रा.मिसारवाडी यांची खाजगी मालकीची इमारत मनपा शिक्षण विभागाने भाडे तत्वावर घेतली आहे. सदर इमारतीचे क्षेत्रफळ 17.92 चौ.मी. एवढे आहे. त्याचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.1649/- प्रती महाप्रमाणे देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 21 ते 25 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.मिसारवाडी येथील बालवाडीसाठी भाडे तत्वावर घेतलेल्या श्री.आर.के. दांडगे यांच्या खाजगी मालकीच्या इमारतीचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.1649/- प्रती महाप्रमाणे देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 22 :

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीने तसेच भाडे समितीच्या मान्यतेने सहा.संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.मिसारवाडी येथील प्राथमिक शाळेसाठी श्रीमती शकुंतला अहिरे रा.मिसारवाडी यांची खाजगी मालकीची इमारत मनपा शिक्षण विभागाने भाडे तत्वावर घेतली आहे. सदर आर.सी.सी. इमारतीचे क्षेत्रफळ 8.68 चौ.मी. एवढे आहे. त्याचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.678/- प्रती महाप्रमाणे तसेच पत्र्याचे रूमचे क्षेत्रफळ 31.14 चौ.मी. चे सिध्द शिघ्र गणकानुसार मासिक भाडे रू.1580/- देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.मिसारवाडी येथील प्राथमिक शाळेसाठी भाडे तत्वावर घेतलेल्या श्रीमती शकुंतला अहिरे यांची खाजगी मालकीची इमारतीचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.678/- प्रती महाप्रमाणे तसेच पत्र्याचे रूमचे क्षेत्रफळ 31.14 चौ.मी. चे सिध्द शिघ्र गणकानुसार मासिक भाडे रू.1580/- देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 23 :

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीने तसेच भाडे समितीच्या मान्यतेने सहा.संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.मुजफ्फरनगर येथील प्राथमिक ऊर्दु शाळेसाठी सौ.कमल संजय जगताप रा.एकतानगर यांची खाजगी मालकीची इमारत मनपा शिक्षण विभागाने भाडे तत्वावर घेतली आहे. सदर इमारतीचे क्षेत्रफळ 67.91 चौ.मी. एवढे आहे. त्याचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.8806/- प्रती महाप्रमाणे देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.मुजफ्फरनगर येथील प्राथमिक ऊर्दु शाळेसाठी भाडे तत्वावर घेतलेल्या सौ.कमल संजय जगताप रा.एकतानगर यांची खाजगी मालकीची इमारतीचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.8806/- प्रती महाप्रमाणे देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 24 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीने तसेच भाडे समितीच्या मान्यतेने सहा.संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.जयसिंगपुरा येथील प्राथमिक ऊर्दु शाळेसाठी श्री.अलीम खान यासीन खान रा.मकबरा रोड यांची खाजगी मालकीची इमारत मनपा शिक्षण विभागाने भाडे तत्वावर घेतली आहे. सदर इमारतीचे क्षेत्रफळ 89.21 चौ.मी. एवढे आहे. त्याचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.6800/- प्रती महाप्रमाणे देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.जयसिंगपुरा येथील प्राथमिक ऊर्दु शाळेसाठी शिक्षण विभागाने भाडे तत्वावर घेतलेल्या श्री.अलीम खान यासीन खान रा.मकबरा रोड यांच्या खाजगी मालकीच्या इमारतीचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.6800/- प्रती महाप्रमाणे देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 25 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीने तसेच भाडे समितीच्या मान्यतेने सहा.संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.प्रियदर्शनी इंदिरानगर येथील बालवाडीसाठी श्री.मोहम्मंद सलीम मो.गणी रा.प्रियदर्शनी इंदिरानगर यांची खाजगी मालकीची इमारत मनपा शिक्षण विभागाने भाडे तत्वावर घेतली आहे. सदर इमारतीचे क्षेत्रफळ 18.81 चौ.मी. एवढे आहे. त्याचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.1280/- प्रती महाप्रमाणे देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.प्रियदर्शनी इंदिरानगर येथील बालवाडीसाठी भाडे तत्वावर घेतलेल्या श्री.मोहम्मंद सलीम मो.गणी यांची खाजगी मालकीची इमारतीचे सिध्द शीघ्र गणकानुसारचे मासिक भाडे रू.1280/- प्रती महाप्रमाणे देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 26 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड इ व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरमियॉ दर्गाचौक जवळील आठवडी बाजार परिसरात असलेले सुलभ शौचालय भाडेतत्वावर देणेबाबत दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून निविदा पत्रके मागविली असता, तीन निविदा प्राप्त झाल्या, व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता त्या बाबतचा तपशिल खाली दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | देकार दर प्रति वर्ष भाडेपट्टा रक्कम |
|---|---|---|
| 1 | श्री.संजय प्रसंदा रजोरा,<br>दादा बावरी, सुशिक्षित बेरोजगार युवक सफाई कामगार सेवा सह.संस्था मर्या.औरंगाबाद | रूपये 17,000/- प्रति वर्ष |
| 2 | श्री.अजय रिडलान,<br>जय माताजी सॅनेटरी सर्व्हिसेस, औरंगाबाद | रूपये 7,200/- प्रति वर्ष |
| 3 | श्री.विशाल रिडलान<br>रा.गांधीनगर, औरंगाबाद | --- |

उपरोक्त दर्शविण्यात आल्यानुसार अ.क्र.03 वरील निविदा धारक यांनी अनामत रक्कम रूपये 1,000/- चा धनाकर्ष सादर केलेला नाही त्यामुळे त्यांचे देकार दर उघडण्यात आले नाही.

तसेच अ.क्र.01 व 02 वरील उर्वरित दोन निविदा धारकांपैकी तुलनात्मकदृष्ट्या श्री.संजय प्रसंदा रजोरा, दादा बावरी, सुशिक्षित बेरोजगार युवक सफाई कामगार सेवा सह. संस्था मर्या. औरंगाबाद यांनी विषयांकित शौचालय चालविणेसाठी भाडेपट्टापोटी रक्कम रूपये 17,000/- प्रतिवर्ष देकार दर दाखल केलेले असुन तुलनात्मकदृष्ट्या सदर दर हे सर्वात जास्त आहेत. उपरोक्त भाडेपट्टा रकमेस मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली असून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करणे बाबत आदेशीत केले आहे.

करिता श्री.संजय प्रसंदा रजोरा, दादा बावरी, सुशिक्षित बेरोजगार युवक सफाई कामगार सेवा सह. संस्था मर्या. औरंगाबाद यांनी शहानुरमीयॉ दर्गाचौक जवळील आठवडी बाजार परिसरात असलेले सुलभ शौचालय निविदेतील अटी व शर्तीनुसार पुढील पाच वर्षासाठी भाडेतत्वावर चालविणेकरीता प्रतिवर्ष देकार दर रक्कम रूपये 17,000/- (अक्षरी रूपये सतरा हजार फक्त) चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

**संवाद :**

श्री.समीर राजुरकर :सुलभ सौचालयाचा विषय आलेला आहे. सुलभ सौचालय हे नागरीकांच्या सुविधेसाठी बांधण्यात आलेले आहे. आऊटलेट, सिव्हरेज हे नाल्यांमध्ये ओपन सोडले जाते. सिव्हरचा त्रास आजुबाजूला राहणाऱ्या नागरीकांना सतत होतो. नाल्यांमध्ये लॅन्डहोल न करता डायरेक्ट नाल्यांमध्ये सोडले जातात. औरंगपुरा येथे शिवसेना भवनची वास्तु तयार होत आहे. त्याच्या बाजुला असलेले सुलभ सौचालय ओपन सोडलेले आहे. सिध्दार्थ गार्डनच्या बाजुला असलेले सुलभ सौचालय ओपन सोडलेले आहे त्या ठिकाणच्या आजुबाजूच्या नागरीकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सुलभ सौचालय देतांना त्यांचेकडून ॲग्रीमेंट लिहीण्यात यावे. आजुबाजूच्या नागरीकांना त्याचा त्रास होणार नाही. आऊटलेट लाईन नाल्यात न सोडता ड्रेनेजला जोडणी करावी.

मा.सभापती :या बाबतीत प्रशासनाने पुर्णपणे काळजी घ्यावी. सुलभ सौचालयाची आऊटलेट लाईन नाल्यात न सोडता ड्रेनेजला जोडणी करावी. विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरमियॉ दर्गाचौक जवळील आठवडी बाजार परिसरात असलेले सुलभ शौचालय भाडेतत्वावर देणेकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात जास्त दराची श्री.संजय प्रसंदा रजोरा, दादा बावरी सुशिक्षित बेरोजगार युवक सफाई कामगार सेवा सह. संस्था मर्या. औरंगाबाद यांची निविदा, निविदेतील अटी व शर्तीनुसार त्यांना पुढील पाच वर्षासाठी भाडेतत्वावर चालविणेकरीता प्रतिवर्ष देकार दर रक्कम रूपये 17,000/- (अक्षरी रूपये सतरा हजार फक्त) प्रमाणे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 27 :**

मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.7004/2011 दिनांक 10/07/2012 रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री.तुकाराम गोपीचंद जाधव, माजी वार्ड अधिकारी यांनी कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/आस्था-1/2011/1280, दिनांक 07 सप्टेंबर 2011 अन्वये त्यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्याच्या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

संवाद :

**श्री.समीर राजुरकर** :सुनावणीनंतर अपिलासंदर्भात स्थायी समितीने घेतलेला निर्णय कायद्याने अंतिम राहिल का? खुलासा करण्यात यावा.

**विधी सल्लागार** :जो मुद्दा मांडलेला आहे की, स्थायी समितीचा निर्णय अंतिम राहिल काय? लीगल स्टेटसनुसार जो काही स्थायी समितीचा निर्णय असेल तो ॲक्टनुसार ॲक्ट चॅलेंज करण्याचे किंवा अपिल करण्याचे अधिकार असेल तर त्यांना कायद्यानुसार मुभा असेल. तो निर्णय चॅलेंज करण्याची मुभा त्यांना असेल जी काही लीगल रेमीडी कायद्यामध्ये अस्तित्वात असेल त्यांना उपलब्ध करून घेण्याची मुभा असेल.

**मा.सभापती** :मा.उच्च न्यायालय मुंबई,खंडपीठ औरंगाबाद याचिका क्रमांक 7004/2011, दिनांक 10.07.2012 रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री.तुकाराम गोपीचंद जाधव, माजी वार्ड अधिकारी यांच्या कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/ 1/2011/1280, दिनांक 7 सप्टेंबर 2011 अन्वये महानगरपालिकेतुन काढुन टाकण्याचा आदेशा विरोधात स्थायी समितीकडे अपील केलेले आहे.

**श्री.विजेंद्र जाधव** :एकुण 8 प्रकरण असुन श्री.तुकाराम जाधव यांनीच अपील केलेले आहे का?

**मा.सभापती** : 8 ही जणांची अपील आलेली आहे.

**श्री.विजेंद्र जाधव** : स्वतंत्र स्थायी समितीची सभा आयोजित करून 8 जणांचे अपील एकत्र घेण्यात यावे.

**मा.सभापती** :स्थायी समितीमध्ये एक बैठकीत एक अपील घेण्यात येणार आहे. सगळे निर्णय राखीव ठेवुन एकदाच निर्णय देण्यात येणार आहे. महानगरपालिकेने फ्रेम केलेल्या चार्जेस त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

**श्री.तुकाराम जाधव** :अपील स्विकारल्याबद्दल सर्वांचे आभारी आहे. माझ्यावर लावण्यात आलेले चार आरोप आहेत. ते अपीलामध्ये नमुद केलेले आहेत. 1124 भरती प्रकरणामध्ये माझ्यावर आरोप ठेवण्यात आलेले आहेत. या अपीलामध्ये मी माझे अभीकथन पुर्णपणे आपल्या निर्दशनास आणुन दिलेले आहे. लेखी स्वरूपात दिलेले आहे. क्रमांकनुसार अपील वाचवुन दाखविण्यात येते. आपल्या परवानगीनुसार अपील सादर करीत आहे. मी महानगरपालिकेत सेवेत असतांना सेवानिवृत्तीच्या उंबरठयावर माझी सेवानिवृत्तीची तारीख 22 दिवसांची असतांना मला सेवेतुन काढुन टाकण्यात आलेले आहे. माझ्यावर लावण्यात आलेले आरोप मला अमान्य आहे हे मी वारंवार चौकशी अधिकारी, सादर कर्ता अधिकारी व आयुक्तांना यांना सादर केलेले आहे. चौकशी अधिकारी यांनी माझ्या अपीलावर बोलण्याची किंवा माझे समर्थन घेण्याची मला संधी उपलब्ध करून दिलेली नाही. अन्यथा ही वेळ माझ्यावर आलीच नसती.

**मा.सभापती** :आपल्यावर लावण्यात आलेल्या चार आरोपांचा खुलासा करण्यात यावा.

**श्री.तुकाराम जाधव** : आरोप क्रमांक 1 आरक्षण लागू करणे बाबत मी सादर करतो शासन निर्णय दिनांक 10 नोव्हेंबर 2003 नुसार दर्शविल्यानुसार आरक्षण लागू केलेले नाही. असा आरोप आहे. तो मी साफ नाकरू इश्चितो.

**नाकारतो. याबाबत लेखी माहिती दिलेली आहे. 1124 ची नव्याने भरती झाली नसुन** शासन निर्णय दिनांक १० नोव्हेंबर २००३ अट क्रमांक (२) नुसार महापालिकेतील रोजंदारीवर काम करणा-या ११२४ सेवकाच्या सेवा, उच्च न्यायालयाने मान्य केलेली जेष्ठता सूची आणि महापालिकेने केलेली जेष्ठतासूची विचारात घेऊन, नियमीत करावयाच्या होत्या, **त्या** सेवा नियमित करण्यासाठी मा.आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती, त्या समिती समोर सादर केलेले टिपणीलेखन, मसुदालेखन, समितीने घेतलेले निर्णय, त्यास अनुसरुन मा.स्थायी समितीने दिलेली मान्यता इत्यादि बाबी विचारात घेउन त्या सेवकांच्या सेवा नियमित झाल्या होत्या. प्रस्तूत प्रकरणी **1124 कद्धह्महचाऱ्यांची जेष्ठता यादी आणि न्यायालयाची यादी मी नोव्हेंबर 2003 मध्ये माझ्याकडे आस्थापना-2 चा अतिरिक्त कारभार देण्यात आला तत्पुर्वी यादी बनविण्यात आली होती. न्यायालयाची यादी आणि मनपाची यादी अगोदरच तयार करण्यात आलेली होती. ती माझ यासमोर ठेवण्यात आली. तीच यादी मा.आयुक्त साहेबांनी तयार केलेल्या मा.निवड समितीसमोर ठेवण्यात आलेली आहे. निवड समितीने जो निर्णय दिलेला आहे तो मी अंमलात आणलेला आहे. मी स्वत: माझ्या मनाने किंवा अधिकारात कुठलेही निर्णय घेतलेले नाही. हे मी घेऊ शकतच नव्हतो हे शासन निर्णयात नमुद केलेले आहे. मला देण्यात आलेली यादीत किंवा त्यात मला खोडतोड,मोडतोड किंवा त्याला कुठल्याही प्रकारचा घेण्याचा अधिकार मुळीच नव्हता. ते अधिकार केलेलेच नाही. सर्वस्व हा अधिकार निवड समितीचा होता त्यात कुठेही मी ढवळाढवळ केली नाही. आरक्षणचा निर्णय समितीने ठरवलेला आहे. आणि तो त्या समितीने घेतलेला आहे. याच आरोपाबाबत माझेसह आरोपी,**मा.उपआयुक्त श्री.एम.वाय.कांबळे, यांचेवर अ.क्र.(१) ठेवण्यात आला होता,**परंतु चौकशी अधिकारी यांनी त्याच आरोपातून त्यांना निर्दोष सोडण्यात आलेले आहे. मला मात्र दोषी ठेवण्यात आलेले आहे. हे माझ्यामते व्यक्तीभेद करणारा आणि अपमानकारक करणारा आहे. तो निर्देशनास आणु इश्चितो. या सदंर्भातील अहवाल पान क्रमांक 22, 4 आणि 5,6 मध्ये उल्लेख आहे. याप्रकरणी कुठलेही शिस्तभंग किंवा माझ्यामते कोणताही अपराध झ ालेला नाही. हा आरोप माझ्यावर लावण्यात आलेला आहे. हा आरोप माझ्यावर सिध्दच होत नाही.**

**आरोप क्रमांक ३ मध्ये ११२४ पदाऐवजी ११३७ पदे भरल्याचा आरोप करण्यात आला होता** या बाबत सादर करतो की, हा निर्णय दिनांक १० नोव्हेंबर २००१ नुसार मंजूर झालेली ११२४ पदे आणि शासन निर्णय दिनांक १५-१०-२००१ नुसार मंजूर झालेली २० पदे अशी दोन्ही मिळून मंजूर झालेल्या ११४४ पदें **येतात याबाबतीतचा गोषवारा व समितीचा अहवाल दिलेला आहे. पान क्रमांक 5 चे कृपया अवलोकन व्हावे. सदरची भरती 1144 च्या ऐवजी दोन्ही शासन निर्णय मिळुन गोषवारा दिलेला आहे. गोषवारामध्ये 1144 पदे असतांना तेवढीपदे भरलेली नाही. सदरील गोषवारा आपल्या निर्दशनास आणु इच्छितो.**

**निवड समितीचा 22.1.2004 चा अहवाल पेज क्रमांक 1 चे कृपया अवलोकन व्हावे. त्यामधे 18 आणि 2 अशी पदे निर्माण झालेली आहेत. दोन्ही जीआरमधील पदांची बेरीज केलेली आहे. त्याचा गोषवारा देण्यात आलेला आहे. यामध्ये 1124 पदे आणि पुर्वीची 20 पदे अशी 1137** पदे भरण्यात **आलेली आहे. यात कुठलाही भेदभाव केलेला नाही किंवा शासन मान्यतेपेक्षा जास्त पदे भरलेली नाहीत. सर्व कागदपत्रांचे आधारे सिध्द होते की, कुठलेही अधिकची पदे भरलेली नाहीत. म्हणुन माझ्यावर लावण्यात आलेला हा आरोप सिध्द होत नाही.**

**आरोप क्रमांक ४ मध्ये शासन निर्णयात मान्यता नसलेली पदे भरल्या बाबत हा आरोप आहे, सदरच्या याद्या मी येण्यापुर्वी तयार केलेल्या आहेत. दैनिक वेतनावर त्यावेळेस जे कर्मचारी कार्यरत होते. त्यावेळेस ते कर्मचारी कोणकोणत्या विभागात कार्यरत होते. त्याची यादी आहे. दैनिक वेतनावर 1988, 1981 मध्ये जी भरती करण्यात आलेली आहे. त्या दैनिक वेतनच्या कर्मचारी यांना कुठे काम द्यावे हा अधिकार मा.आयुक्तांचा आहे. आवश्यकतेनुसार त्या अधिकाऱ्याने मा.आयुक्तांनी कामावर दिलेले आहे. महापौर निवास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, जायकवाडी प्रकल्प, बांधकाम विभागात कर्मचारी कार्यरत होते. यांची माहिती समितीला देण्यात आली. या पदाव्यतिरिक्त मी भरती केलेली नाही. मी त्या ठिकाणी येण्यापुर्वीच अधिकारी यांनी नेमणुका दिल्या होत्या, त्याच ठिकाणी त्यांना समावेश करण्यात आलेले आहे. नविन अशी नियमित भरती नव्हती. भरती हा शब्द शासनाने मंजूर केलेल्या पदानुसार मनपाकडे 1981 पासुन दैनिक वेतन कर्मचारी यांना समावेश केलेले आहे त्याच लोकांना समावेश या ठिकाणी केलेला आहे. या ठिकाणी कोणतीही जास्तीची पदे भरलेली नाहीत किंवा नेमणुक दिलेली नाहीत. त्यामुळे हा देखील आरोप सिध्द होत नाही.**

आरोप **ठेवण्यात आलेला** आहे की (चौकशी अहवालाचे पान क्रमांक ७१,७२ पहावे)उद्यान विभागाच्या जेष्ठता यादीतील अनुक्रमांक(२) वरील श्रीमती लिला अनिल ब्रम्हणे असे नांव नमूद केलेले असताना आदेश देताना श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे असा उल्लेख केल्या बाबत हा दोष आहे,**या महिलेने** मा.उच्च न्यायालयात **रिट याचिका क्र.3389/94 दाखल केलेली होती. तत्कालिन अधिकारी यांनी चौकशी केलेली होती. समितीने प्रत्येक विभागप्रमुखाला वैयक्तिकरित्या पाचारण करून हे कर्मचारी आपल्याकडे कार्यरत आहेत, त्यांची ओळख पिरेड घेण्यात आलेली आहे. त्यांच्या ओळख पिरेडीनुसार नांव बदलने, त्यांची ओळख पटविणे, चुका दुरूस्त करणे नियमात बदल करणे हया त्या निवड समितीच्या दिलेल्या आदेशाचे आहे यात उल्लेख केलेला आहे.** (निवड समितीचा अहवाल दिनांक २२/१/२००४ पान क्रमांक ६ वरील मार्कींग अ पहावी) **ही सर्व प्रक्रीया मा.आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करण्यात आलेली होती. त्या निवडसमितीने घेतलेले सर्व**

निर्णय होते. निवड समितीने जे निर्णय घेतले तेच मी प्रामाणिकपणे राबविलेले आहे. यात माझे वैयक्तिक किंवा माझ्या स्वतःच्या मनाने कोणतेही कार्य केलेले नाही. ज्यामुळे महानगरपालिकेची बदनामी होईल. माझ्यापदाचा गैरवापर केलेला आहे अशा कोणत्याही प्रकारची कार्यपध्दती मी केलेली नाही अशी आढळुन येईल. हेच आरोम मा.आयुक्तांनी गठीत केलेल्या निवड समितीला लागु होते. याच आरोपाखाली माझ्या सहआरोपींना चौकशी अधिकारी यांनी निर्दोष मुक्त केलेले आहे. मा.आयुक्तांच्या निवड समितीमध्ये हे सदस्य होते त्यामुळे त्यांच्यावर कोणतेही आरोप सिध्द होत नाही. असा निष्कर्ष काढला आहे. चौकशी अहवालात हे शब्द प्रयोग आहेत. तत्कालिन आयुक्तांनी गठीत केलेल्या समितीचा मी सदस्य नव्हतो. म्हणुन माझ यावर हे आरोप बसविण्यात आलेले आहेत. म्हणुन माझ्यावर हे आरोप सिध्द होतात का? असे मुळीच नाही. माझ्या सहआरोपीवर हे आरोप सिध्द होत नसतील तर माझ्यावर न्यायभावनेने एकही आरोप सिध्द होत नाही. अशी धारणा व खात्री आहे. याची मा.आयुक्त, मा.सभापती व सभागृहाची खात्री होईल. हया खात्रीअंती मी पुर्णपणे निर्दोष आहे. हे या ठिकाणी सिध्द होते. जेव्हा मला सहाय्यक आयुक्त-2 चा पदभार देण्यात आला तत्पुर्वीच दिनांक 24 नोव्हेंबर 2003 रोजी पूर्वी दैनिक वेतन कर्मचाऱ्यांच्या याद्या तयार झालेल्या आहेत. निवड समितीच्या अहवालाचे अवलोकन केल्यास त्यामध्ये प्रथम नियुक्तीच्या दिनांक दिलेल्या आहेत. 1981,1982 किंवा तद्नंतर 2000 हे त्यात्या विभागाने भरती केलेल्या आहेत. या निवड समितीत त्यांच्या नियुक्त्यांच केल्या नाहीत. मी जर हया नेमणुकाच केलेल्या नाहीत तर शासन निर्णयामध्ये कुठल्याही प्रकारचा खाडाखोड करणे, कोणतेही शब्द टाकणे, तोडमोड करणे मुळीच मला अधिकार पोहचत नव्हता व नाही. जसा हा शासन निर्णय आहे त्याच प्रमाणे ती कार्यप्रणाली राबविण्यात आलेली आहे. यात मुळीच शंका नाही. बोलण्याच्या आवेशामध्ये कुठे चुकलो असेल आवाज चढला असेल तर मा.सभापतींनी सभागृहाने मला क्षमा करावी. दिनांक 07.09.2011 रोजी सेवेतुन काढुन टाकण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानंतर दिनांक ०९ सप्टेबंर २०११ व्दारे (सुलभसंदर्भासाठी प्रत सोबत जोडत आहे विनाचौकशी कार्यालयीन दंड रक्कम रुपये १०,०००/- ठोठावण्यात आला आणि दंड केलेल्या रकमेपैकी सप्टेंबर २०११ मध्ये अनुज्ञेय असणा-या सहा दिवसाचे वेतन अनुज्ञये ठरवून त्यातून रक्कम रुपये ६,९४८/- परस्पर कपात करुन वसुल करण्यात आलेली आहे. माझ्या प्रामाणिक सेवेचे मला अपमानकारक, अन्यायकारक हा मुद्दा वाटतो. कृपया विनंती करण्यात येते की, तोही आदेश रद्द करण्यात यावा. दंडात्मक रक्कम मला परत करण्यात यावी. मा.आयुक्तांचा आदेश विचारपुर्वक, न्यायपुर्वक रद्द करून मला पुर्वरत त्याच दिवशी सेवेमध्ये रूजू करुन घ्यावे, ही नम्र विनंती.

मा.सभापती :प्रशासनातर्फे खुलासा करण्यात यावा.

**आस्थापना अधिकारी-1** **:-श्री.तुकाराम गोपीचंद जाधव, वार्ड अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद हे सहाय्यक आयुक्त-2 पदावर कार्यरत असतांना 1124 कर्मचाऱ्यांची भरती झाली आणि त्यामध्ये अनियमितता झाली म्हणुन जा.क्र.मनपा.आस्था-1/340/2012, दिनांक 09.07.2007 रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. सदर नोटीसीचा खुलासा अमान्य करून प्रशासनाने त्यांचेविरूध्द खाते चौकशी प्रस्तावित केली. दोषारोपपत्र शिस्त व अपिल 1979 चे नियम 8 अंतर्गत त्यांचेवर दोषारोप बजावण्यात आले. त्याचा चौकशी अहवाल मा.चौकशी अधिकारी यंनी सादर केला. त्यानुषंगाने खुलासा सादर करण्यात येत आहे.**

**1.** **शासन निर्णयात आरक्षणाच्या सूचना स्पष्टपणे नमूद केलेल्या असतांना कोणत्याही पदास आरक्षण न लावता पदाची भरती करणे.**

**त्याच्या पृष्टयार्थ शासनाने पारीत केलेला शासन निर्णय 10 नोव्हेंबर 2003 अट क्रमांक 4 मध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे. की, आरक्षणाचे प्रशासनाने काटेकोरपणे पालन करावे. चौकशी अधिकाऱ्यापुढे ज्यावेळेस सुनावणी झाली त्यावेळेस त्यांनी अहवालात दिले की, श्री.टि.जी.जाधव यांनी याबाबत साक्षीत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे 54(1) नुसार निवड समिती गठीत करण्यात आली व त्या समितीच्या निर्णयानुसार भरती प्रक्रीया पुर्ण झाली असा त्रोटक खुलासा 14.01.2011 च्या साक्षीत नोंदविलेला आहे. वास्तविक श्री.टि.जी.जाधव आस्थापना विभागात कार्यरत होते. 1124 ची भरतीची प्रक्रीया आस्थापना-2 विभागामार्फतच पुर्ण करण्यात आलेली आहे. अपचारी अधिकारी एक जबाबदार अधिकारी असतांना व शासन निर्णयात आरक्षणाबाबत स्पष्ट सूचना असतांना त्यांनी कोणत्याही पदास आरक्षण न लावता पदे भरली . भरती करण्याबाबत प्रस्तावित करून शासन निर्णयाचे निटपणे पालन केले नाही किंवा त्याविषयी वरीष्ठांकडे कुठल्याही प्रकारची टिका टिप्पणी सादर केली नाही. उपलब्ध संचिकेच्या कागदपत्रामधुन दिसून येत नाही. जर अशा प्रकारची टिपणी टाकुन समितीच्या निर्दशनास ही बाब आणली असती तर त्यावर निश्चित कारवाई झाली असती शिवाय त्यांचेवर ठेवण्यात आलेला दोषारोपाबाबत निरापराधीत सिध्द करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा सादर न करता. मोघम दोन ओळीची साक्ष नोंदविली आहे. आस्थापना-2 विभागामध्ये भरतीचे महत्वाचे काम होत असल्यामुळे शासन आदेशात कोणत्या अटी नमूद आहे त्या अटी व शर्तीनुसारच भरती प्रक्रीया पार पाडणे आवश्यक होते. या संबधी प्राथमिक जबाबदारी सहाय्यक आयुक्त या नात्याने श्री.टि.जी.जाधव यांची होती. परंतु त्यांनी ती जबाबदारी समाधानकारकरित्या पार पाडली अशी संचिकेत उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येत नाही. श्री.टि.जी.जाधव यांचेवर ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द होतो. चौकशी अधिकारी यांनी हा आरोप सिध्द केलेला आहे.**

**2.** **शासन निर्णयात शैक्षणिक अर्हतेस शिथिलता देण्यात आलेली होती. परंतू काही उमेदवार हे पूर्णतः निरक्षर असतांना सुध्दा नियुक्ती देण्यास मदत करणे.**

**हा ठेवण्यात आलेला आरोप सिध्द झालेला नाही. शैक्षणिक अर्हतेस शिथिलता देण्यात आल्यामुळे व भरती केलेले उमेदवार हे चतुर्थ श्रेणी संवर्गातील असल्यामुळे व त्यांना शारिरीक कामेच करावी लागत असल्यामुळे व संबधीत नेमणुका निवडसमितीने केल्यामुळे अपचारी अधिकारी यांचेवर ठेवलेला आरोप सिध्द होत नाही.**

**3.** **शासनाने मान्यता दिलेल्या पदापेक्षा अधिक पदे भरली.**

**शासनाची मान्यता 1124 पदांना मिळालेली होती. एकुण 1137 पदाची भरती झालेली आहे. मान्यतेपेक्षा जास्त भरती केली असा दोषारोप होता याबाबत उपचारी अधिकारी यांनी त्यांचे साक्षीत शासनाने मान्यता दिलेल्या 1124 पदापेक्षा अधिक पदे भरण्यात आली नाही हे चुकीचे आहे. वेळोवेळी निवड समितीच्या बैठकीमध्ये अपचारी अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीवरून खाली दर्शविल्याप्रमाणे नेमणुका करण्याची शिफारस केलेली आहे. दिनांक 31.03.2003 ची जी बैठक झाली त्यात 819 पदांची शिफारस केलेली आहे. दिनांक 31.03.2003 ची जी बैठक झाली त्यात 20 पदे मसनजोगीची दिनांक 22.01.2004च्या निवड समितीच्या बैठकीत 217 पदे मजूर, 24 लाईनमन 1 संगणक ऑपरेटर, 20 आरोग्य सेवक/ सेविका, 2 नोंदणी लिपीक, निवड समितीच्या अहवालाप्रमाणे 34 असे 1137 पदांची भरती झालेली आहे. त्यामुळे मान्यतेपेक्षा जास्त भरती झाली हा दोषारोप चौकशी अधिकाऱ्यांनी सिध्द केलेला आहे.**

**4.** **शासन निर्णयात मान्यता नसलेल्या विभागातील पदे भरणे.**

**शासन निर्णय 10 नोव्हेंबर 2003 चा त्यामध्ये पान क्रमाक 2 वरती 1124 पदे आणि ती कोणकोणत्या विभागाची आहे त्यासंबधी आहे. 19 विभागांना त्यांनी मान्यता दिलेली आहे. सर्व विभागाती साफसफाईचे कर्मचारी मुख्य कार्यालयातील सर्व विभाग शिपाई, शिक्षण विभाग सेवक, आरोग्य विभाग, दाया, अन्टेंडड, मलेरिया विभाग मलेरिया मजूर, उद्यान विभाग माळी, पशुधन विभाग मजूर, सुरक्षा विभाग वॉचमन, विद्युत विभाग लाईनमन, पाणीपुरवठा मजूर, यांत्रिकी विभाग क्लिनर हेल्पर, जकात विभाग हमाल जवान, प्रकल्प विभाग सेवक सेविका, झोन पाणीपट्टी मजूर, बांधकाम विभाग मजूर, रस्ते अतिक्रमण विभाग मजूर, गरवारे क्रिडा संकूल मजूर, मालमत्ता विभाग स्मशानजोगी, संगणक कक्ष संगणक ऑपरेटर 3 या विभागाव्यतिरिक्त अन्य विभागातील कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले. असा दोषारोप होता. चौकशी अंती चौकशी अधिकारी यांनी आपले अभिकथन केलेले आहे. ते पुढील प्रमाणे नमुद करीतो. श्री.टि.जी.जाधव यांच्या साक्षीत शासन निर्णयातील पदे भरलेली नाहीत व निवड समितीच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आली असा मोघम व अपुर्ण खुलासा साक्षीत केला आहे. इतकेच नव्हेतर**

त्यांचेवर दोषारोप काय ठेवला काय उत्तर देतात याचेही भान त्यांचे साक्षीत दिसून येत नाही. शासन निर्णय 2010 मधील 3 मध्ये जोडपत्र 1 मध्ये एकुण 19 विभागाती 1124 पदे मंजूर झाल्याचे स्पष्ट दर्शविले आहे. सांस्कृतिक विभाग,संशोधन केंद्र, महापौर निवास, पुराणवस्तु संग्रहालय, जलतरण विभाग, जायकवाडी, इमारती बांधकाम, मालमत्ता विभाग वाचनालय, नोंदणी विभाग, स्लम अशा 11 विभागातील 3 लिपीकासह एकुण 59 कर्मचाऱ्यांची अपचारी कर्मचारी यांनी नियुक्ती केल्याचे दिसून येते. परंतु उपरोक्त शासन निर्णयात या विभागासाठी कोणत्याही पदाची निर्मिती केलेली नाही. असे असतांना व अपचारी अधिकारी आस्थापना विभागाचे प्रत्यक्ष प्रकरण हाताळनारे संबधीत अधिकारी असल्यामुळे त्यांनी शासन निर्णयात ज्या विभागासाठी पदे मंजूर झालेली आहेत. त्या विभागाची पदे भरणे आवश्यक होते. तशी माहिती व प्रस्ताव सादर करून निवड समितीच्या निर्दशनास आणुन देणे आवश्यक होते. परंतु उपलब्ध कागदपत्रावरून ती पदे शासन निर्णयात मंजूर नसतांना भरण्याची बाब निवड समितीच्या सदस्यांना अंधारात ठेवुन भरली गेली. म्हणुन दोषारोप सिध्द होतो.

5. उद्यान विभागाचे ज्येष्ठता यादीतील अ.क्र.2 वरील श्रीमती.लिला अनिल ब्रम्हणे असे नांव असतांना आदेश देतांना श्रीमती.चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे नावांने आदेश दिले. उपआयुक्त, आयुक्त यांचे निदर्शनास ही बाब न आणून देता, तसेच निवड समितीसमोर सादर करुन बनावट उमेदवारास नियुक्ती आदेश दिले. असा दोषारोप ठेवण्यात आला होता.

चौकशी अंती चौकशी अधिकाऱ्यांने अभिकथन केलेले आहे की, उपचारी अधिकारी यांचेकडे आस्थापना 2 चा कार्यभार होता असे सांगुन त्यांचा तुसूभरही संबध येत नाही. असे सांगीतले वास्तविक मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादी प्रमाणे नेमणुकीचे आदेश देणे आवश्यक होते व ही यादी अपचारी अधिकारी यांचेकडे होती. यादी मध्ये अनुक्रमांक 2 मध्ये श्रीमती.लिला अनिल ब्रम्हणे असे नांव होते तथापी श्रीमती लिला अनिल ब्रम्हणे याच महिलेस नेमणुकीचे आदेश देणे आवश्यक होते. प्रत्यक्ष अपचारी अधिकारी यांनी मनपा आस्था/1056 दिनांक 27.1.2004 अन्वये श्रीमती चंद्रकला अमरसिंग ब्रम्हणे या महिलेस नियुक्ती आदेश दिले. मा.उच्च न्यायालयाची रिट याचिका 3389/94 दिलेल्या निकालावरून व मा.उच्च न्यायालयाने सदर नावांमधील बदला बाबत प्रशासनाने शहानिशा करून सदर नावांतील चुक लेखन दोषामुळे झाली आहे का? किंवा काय? याबाबत निर्णय घ्यावा म्हणुन आदेश पारित केले होते. या निर्णयाप्रमाणे नांवात झालेला चुकीबाबत कोणतीही शहनिशा न करता खरोखर नांवात चुक लेखनदोषामुळे झाली आहे. याबाबत उद्यान विभाग किंवा आस्थापना विभाग यांनी सत्य जाणुन घेण्यासाठी वस्तुस्थिती पडताळून पाहण्यासाठी कोणतीही खास प्रयत्न केल्याचे आढळुन आले नाही.बदल

केलेल्या नांवामध्ये आडनावा व्यतिरिक्त उमेदवाराचे पती,पीता यांच्यामध्ये साम्य आढळुन येत नाही व नांवामध्ये बदलल्याचे नेमके कारण काय? याचाही उपलब्ध संचिकेमधुन सबळ पुरावा आढळुन आला नाही. वरील दोन्ही बाबींवरून ही महिला एकच आहे. किंवा वेगवेगळी आहे म्हणुन बोध होत नाही. म्हणुन जेष्ठता यादीतील नावांव्यतिरिक्त दुसऱ्याच नावांचे नेमणुकीचे आदेश काढणे यालाच सर्वस्वी जबाबदार अपचारी अधिकारी श्री.टि.जी.जाधव असल्याचे दिसुन येते. त्यांनी जेष्ठता यादीतील नावांऐवजी दुसऱ्या कर्मचाऱ्याचे नेमणुकीचे आदो का काढले यासंबधी कोणताही कागदोपत्री पुरावा प्रशासनाकडे सादर केलेला नाही त्यामुळे त्यांचेवर ठेवण्यात आलेला हा दोषारोप सिध्द होतो.

6. जाणूनबुजून गंभीर स्वरुपाच्या कार्यालयीन अनियमितता व शिस्तीचा भंग करणे.

7. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) मधील नियम-3 चा भंग करणे.

ही दोन्ही स्वतंत्र दोषारोप आहेत असे मानता येणार नाही कारण हे दोषारोप क्र. 1 ते 5 शी संबंधित आहेत.

मा.सभापती :10 नोव्हेंबर 2003 च्या शासनाच्या निर्णयाप्रमाणे भरती करण्यात आली. त्यानंतर निवड समिती गठण करण्यात आली. त्या निवड समितीमध्ये कोणकोण होते.

आस्थापना अधिकारी-1 : निवड समितीमध्ये उपआयुक्त (महसूल), उपआयुक्त (प्रशासन) मुख्य लेखाधिकारी आणि आयुक्त.

मा.सभापती :नांवे सांगण्यात यावी.

आस्थापना अधिकारी-1 : उपआयुक्त (म) श्री.शिंदे, उपआयुक्त (प्र) श्री.एम.वाय.कांबळे, मुख्यलेखाधिकारी श्री.महेंद्र खैरनार, व तत्कालिन मा.आयुक्त श्री.जोशी आर. एन.

मा.सभापती :निवड समितीने आरक्षणाबाबत व कुठली पदे कशी पाहिजे याबाबत निवड समितीने सर्व विषय गठण केलेला आहे ?

आस्थापना अधिकारी-1 :निवड समितीचा अहवाल पान क्रमांक 1 वर नमुद केलेले आहे. 231 पदे आरक्षणात येतात म्हणुन दाखविण्यात आलेले आहे.

मा.सभापती :निवड समितीचा अहवाल आहे तो बरोबर आहे.

आस्थापना अधिकारी-1 :होय

मा.सभापती :शासन निर्णयाप्रमाणे 1124 च्या भरती झालेली आहे. त्यात 1137 भरती झालेली आहे.1124 चा सर्व अहवाल संबधीत अधिकारी यांनी बनविला आहे.1124पदे कुठली भरावी,याबाबत गाईडलाईन कुणी केली. पदे भरण्याची संख्या जास्त होती. मंजूर झाली 1124, 1124 पदे सलेक्ट कुणी केली.

आस्थापना अधिकारी-1 : तत्कालिन आस्थापना विभागाने तो प्रस्ताव सादर केला असेल.

मा.सभापती :त्यांनी हा प्रस्ताव सादर केला तेव्हा आस्थापना विभागाला कोणते अधिकारी होते.

आस्थापना अधिकारी-1 :1124 ची भरती झाली त्यावेळेस श्री.टि.जी.जाधव त्यावेळेस कार्यरत होते.

मा.सभापती :अहवाल कुणी तयार केला.

आस्थापना अधिकारी-1 :याबाबत माहिती नाही.

मा.सभापती :याबाबतची माहिती घेण्यात यावी. अहवालाच्यावेळी आस्था-2 संबधीत अधिकारी कोण होते. भरती झाली त्यावेळेस संबधीत अधिकारी श्री.टि.जी.जाधव होते. अहवाल कुणी बनविला त्यावेळेस अधिकारी कोण होते. माझ्या माहितीप्रमाणे आस्था-2 चा अतिरिक्त कार्यभार दि.26 नोव्हेंबर रोजी अतिरिक्त कार्यभार दिला. त्याअगोदर त्या ठिकाणी संबधीत अधिकारी कोण होते त्यांनी हा अहवाल तयार केला.

आस्थापना अधिकारी-1 :याबाबतची माहिती मला नाही. आस्थापना अधिकारी-2 श्री.अभंग यांचेकडे सदरची माहिती असेल ते सध्या बैठकीनिमित्त मुंबई येथे गेलेले आहे.

मा.सभापती :माझ्या माहितीप्रमाणे श्री.मोहम्मंद खान आस्थापना-2 विभागात कार्यरत होते. त्यांनी सर्व अहवाल तयार केला. 1124 पदे भरावयाची होती. 1137 पदे भरली आहे. अजुन काही पदे यामध्ये भरावयाची बाकी होती

आस्थापना अधिकारी-1 :चौकशी अधिकाऱ्यासमोर हे मांडणे आवश्यक होते. 1124 व्यतिरिक्त काहीही आलेले नाही. श्री.टि.जी.जाधव यांनी त्यांच्या अभिकथनामध्ये सांगीतले की, 20 पदे 2001 ची होती ही त्यामध्ये समाविष्ठ केली. चौकशी होत असतांना चौकशी अधिकाऱ्यांसमोर हे आणने आवश्यक होते. 1124+20 अशी 1144 पदांसदर्भात भरती करतो. त्याच्यापैकी 1137 भरती व बाकी रिक्त राहिली. तेव्हा हे निर्दशनास आणावयास पाहिजे होते. चौकशी अधिकारी यांनी कुठेही हे घेतलेले नाही.

मा.सभापती :भरती करत असतांना नेमणुक देत असतांना त्यांची मुळ संचिका तयार केली असेल.

आस्थापना अधिकारी-1 : होय मुळ संचिका तयार केली आहे.

मा.सभापती :सदर संचिका बघण्यासाठी तपासणीसाठी निवड समिती असेल.

आस्थापना अधिकारी-1 :होय. 1124 च्या पुर्ण वेगळया संचिका आहेत.

मा.सभापती :समितीच्या मार्फत संचिका गेल्या असतील, श्री.टि.जी.जाधव यांनी संचिका सबमिट केल्या ते त्यांनी सर्व पाहील्या.यांनी संचिका सबमिट केल्या ते त्यांनी सर्व पाहील्या.

आस्थापना अधिकारी-1 :प्रत्येकाच्या संचिका आहे. समितीसमोर अहवाल ठेवुन मान्यता घेतलेली आहे.

मा.सभापती :समितीसमोर अहवाल ठेवला होता त्या समितीत कोणकोण होते.

आस्थापना अधिकारी-1 :उपआयुक्त (म) श्री.शिंदे, उपआयुक्त (प्र) श्री.एम.वाय.कांबळे, मुख्यलेखाधिकारी व तत्कालिन मा.आयुक्त.

मा.सभापती :1124, 1137 सर्व संचिका या सर्वांच्या तपासणीतुन/समोरून गेली. या समितीने सर्व संचिकांची एक एक करून तपासणी केली.

आस्थापना अधिकारी-1 :होय

मा.सभापती :श्री.टि.जी.जाधव यांनी संचिका पुटअप केल्या त्यांची तपासणी निवड समितीने केली. त्यांच्या माध्यमातुन गेलेली आहे.

आस्थापना अधिकारी-1 :होय, निवड समितीच्या माध्यमातुन संचिका गेलेली आहे.

मा.सभापती : कुणाच्या आदेशाने यादी झाली.

आस्थापना अधिकारी-1 :1994मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद यांनी आदेश केला होता जे कर्मचारी महानगरपालिकेवर दैनिक वेतनावर कार्यरत आहे. त्यांची जेष्ठता यादी तयार करा म्हणुन मा.न्यायालयाने आदेश पारित केला होता. त्याच्यानुसार ही जेष्ठता यादी तयार झाली.

मा.सभापती :मा.उच्च न्यायालय आणि महानगरपालिका मिळुन यादी तयार झाली. या यादीच्या हिशोबाने सर्व भरती केली.

आस्थापना अधिकारी-1 :होय, बरोबर आहे.

मा.सभापती :प्रशासनाच्या म्हणण्यानुसारअशा काही लोकांना पदोन्नती/भरती केल्या सांस्कृतिक विभाग, संशोधन केंद्र, महापौर निवास, पुराणवस्तु संग्रहालय, जलतरण विभाग, प्रशासनमध्ये नेमणुक करत असतांना मा.आयुक्तांना अधिकार आहे कुठे कुणाला नेमायचा.

आस्थापना अधिकारी-1 :मा.आयुक्तांना अधिकार आहेत.

मा.सभापती :बदल्या होऊ शकतात. संग्रहालयचा कर्मचारी वार्डात येऊ शकतो एकाच ठिकाणी कायम कर्मचारी राहु शकत नाही.

आस्थापना अधिकारी-1 :बरोबर आहे.

मा.सभापती :नांव बदलण्याबाबत आरोप आहे. पान नंबर 6 वर समितीचा अहवाल आहे. सर्व संबधीत विभाग प्रमुखांकडुन प्रमाणित करून घेण्यात आलेले असुन वेतन पत्रके तपासण्यात आली. नावांमध्ये अथवा जन्मतारखांमध्ये लेखनाच्या चुका व त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरून व कार्यालयीन अभिलेख्यावरून दुरूस्त करण्यात आल्या व वयाची व शैक्षणिक अर्हतेत शिथीलता देण्यात आली. कर्मचाऱ्याच्या नावांमध्ये फक्त क मध्ये तशी नोंद घेण्यात आली आहे व कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी 2550-3000 मध्ये मजूर म्हणुन शिफारस करण्यात आली. हा समितीचा अहवाल आहे. समितीच्या अहवालात सर्व तपासण्यात आलेले आहे. बरोबर आहे.

आस्थापना अधिकारी-1 :आहे.

मा.सभापती :निवड समितीने नांव,जन्मतारिख वगैरे सर्व तपासणी केलेली आहे.

आस्थापना अधिकारी-1 :बरोबर आहे.

मा.सभापती :निवड समितीने दिलेली 1124 जी पदे भरली आहे. ती बरोबर भरली आहे?

आस्थापना अधिकारी-1 :चौकशी मध्ये आलेले आहे की, 1124 ऐवजी 1137 पदे भरली आहे.

मा.सभापती :जकात विभाग, प्रकल्प विभाग, यांत्रिकी विभाग, व इतर विभाग त्या त्या विभागांना तेवढे कर्मचारी नेमणुक बरोबर झाले होते.

आस्थापना अधिकारी-1 :मुख्य कार्यालय शिपाई 26 शिक्षण सेवक 15 , आरोग्य विभाग 12 , उद्यान विभाग 57, सुरक्षा विभाग 13, विद्युत विभाग 22, यांत्रिकी 31, जकात विभाग 17, प्रकल्प विभाग 5 , मालमत्ता विभाग 30, संगणक कक्ष 03 एकुण 231.

मा.सभापती :समितीने दिल्यानुसार सर्व विभागवाईझ पदे बरोबर भरली होती.

आस्थापना अधिकारी-1 :आहेत.

मा.सभापती : सभेपुढील अपिला संदर्भात अपिलकर्ता श्री.टि.जी.जाधव व प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेतले. या अपीलावरील निर्णय राखुन

ठेवण्यात येत आहे. आठही अपीलांची सुनावणी झाल्यानंतर निर्णय घोषित करण्यात येईल.

<u>निर्णय :</u>

आजच्या सभेपुढे असलेल्या अपिला संदर्भात अपिलकर्ता श्री.टि.जी.जाधव व प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेतले असून या अपीलावरील निर्णय राखुन ठेवण्यात येत आहे. सर्व अपिलांची सुनावणी झाल्यानंतर निर्णय घोषीत करण्यात येईल.

<u>विषय क्र. 28 :</u>

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.महापौर, मा.उपमहापौर व इतर स.पदाधिकारी यांना त्यांचे खाजगी वाहन कार्यालयीन कामी वापरा करीता महानगरपालिकेतर्फे सन 2005 व सन 2007 मध्ये मा.स्थायी समितीमध्ये मंजुर झालेल्या विविध ठरावानुसार खालीलप्रमाणे समकक्ष रक्कम मंजुर करण्यात आली होती. व त्या नुसार आतापर्यंत रक्कम अदा करण्यात येत आहे.

| पदाधिकारी | प्रतिमहा समकक्ष रक्कम रूपये | मा.स्थायी समिती ठराव |
|---|---|---|
| मा.महापौर | 29600/- | मा.स्थायी समिती ठराव क्र.12 दि.2.7.2005 नुसार |
| मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता | 21600/- | मा.स्थायी समिती ठराव क्र.12 दि.2.7.2005 नुसार |
| मा.सभापती प्रभाग समिती अ,ब,क,ड,इ,फ व सभापती महिला व बालकल्याण समिती. | 12500/- | मा.स्थायी समिती ठराव क्र.58 दि.13.9.2005 नुसार |
| मा.विशेष समिती सभापती | 10000/- | मा.स्थायी समिती ठराव क्र.76 दि.7.8.2007 नुसार |

वरीलप्रमाणे जी रक्कम देण्यात येत होती ती रक्कम सन 2005 मधील इंधन दर वाहनचालक वेतन व त्यावेळी असलेल्या इतर खर्चानुसार निश्चित करण्यात आली होती. सन 2005 पासून आजपर्यंत इंधन दरामध्ये, वाहनचालकांचे वेतन व देखभाल दुरूस्ती खर्चात वेळोवेळी वाढ झालेली आहे. त्यानुसार सद्यस्थितीतील इंधन दर, किमान वेतन दरानुसार वाहनचालकाचे वेतन व इतर खर्च लक्षात घेता डिझेल व पेट्रोल वाहन वापरासाठी सर्वसाधारणपणे प्रतिमाह खालीलप्रमाणे खर्च येतो.

| पदाधिकारी | प्रस्तावित रक्कम | |
|---|---|---|
| | पेट्रोल वाहना करीता | डिझेल वाहना करीता |
| मा.महापौर | 46500/- | 40500/- |
| मा.उपमहापौर | 37000/- | 31000/- |
| मा.सभापती, स्थायी समिती | 37000/- | 31000/- |
| मा.सभागृह नेता | 37000/- | 31000/- |
| मा.विरोधी पक्ष नेता | 37000/- | 31000/- |
| मा.सभापती प्रभाग समिती अ,ब,क,ड,इ,फ व सभापती महिला व बालकल्याण समिती. | 21500/- | 18000/- |
| मा.सभापती विशेष समिती (एकुण 4 समित्या) | 17000/- | 14000/- |

तरी स.पदाधिकारी यांनी खाजगी वाहन कार्यालयीन कामी वापरल्यास वरीलप्रमाणे समकक्ष रकमेमध्ये वाढ करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथापी मंजुरीस्तव सादर.

**मा.सभापती : प्रस्तावित इंधन खर्चाच्या समकक्ष रक्कमेची वाढ 01 जुन 2012 पासुन लागु करणेस मंजुरी देण्यांत येते.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स.पदाधिकारी यांनी खाजगी वाहन कार्यालयीन कामी वापरल्यास खालीलप्रमाणे समकक्ष रकमेमध्ये वाढ करणेस तसेच सदर समकक्ष रकमेची वाढ 01 जुन 2012 पासून लागु करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.**

| पदाधिकारी | प्रस्तावित रक्कम | |
|---|---|---|
| | पेट्रोल वाहना करीता | डिझेल वाहना करीता |
| मा.महापौर | 46500/- | 40500/- |
| मा.उपमहापौर | 37000/- | 31000/- |
| मा.सभापती, स्थायी समिती | 37000/- | 31000/- |
| मा.सभागृह नेता | 37000/- | 31000/- |
| मा.विरोधी पक्ष नेता | 37000/- | 31000/- |
| मा.सभापती प्रभाग समिती अ,ब,क,ड,इ,फ व सभापती महिला व बालकल्याण समिती. | 21500/- | 18000/- |
| मा.सभापती विशेष समिती (एकुण 4 समित्या) | 17000/- | 14000/- |

**वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 29 :**

**प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.सुनिल ढेकळे, आयुक्तांचे स्वीय सहाय्यक यांच्या पत्नीच्या आजारपणावर कर्करोग (Duct Carcinoma) रक्कम यापुर्वी रू.61,207/- एवढी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच यानंतर त्यांनी दाखल केलेल्या देयकापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.71,204/- एवढी आहे. अनुज्ञेय रक्कम रू.71,204/- च्या 90% रक्कम रू.64,084/- (चौसष्ट हजार चौऱ्यांऐंशी फक्त) पैकी 5% रक्कम रूपये 4,191/- (अक्षरी रूपये चार हजार एकशे एक्यान्नव मात्र) (एकुण देयक रक्कम रू.83,813/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित रक्कम रूपये 59,893/- (अक्षरी रूपये एकोणसाठी हजार आठशे त्र्यान्नव मात्र) एवढ्या रक्कम अदा करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.**

**करिता संबंधीतास पुर्वी अदा करण्यांत आलेली अनुज्ञेय असलेली रक्कम रू.72,374/- च्या 90% रक्कम रू.65,136/- (अक्षरी रू.पासष्ट हजार एकशे छत्तीस फक्त) व दुसऱ्याने अनुज्ञेय असलेली रक्कम रू.71,204/- च्या 90% र.रू.64,084/-(चौसष्ट हजार चौऱ्यांऐंशी फक्त)असे रू.65,136/-+ रू.64,084/- = रू.1,29,220/- या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुनिल ढेकळे, आयुक्तांचे स्वीय सहाय्यक यांच्या पत्नीच्या आजारपणावर (कर्करोग -Duct Carcinoma) खर्च केलेल्या व संबंधीतास पुर्वी अदा करण्यांत आलेली अनुज्ञेय असलेली रक्कम रू.72,374/- च्या 90% रक्कम रू.65,136/- (अक्षरी रू.पासष्ट हजार एकशे छत्तीस फक्त) व दुसऱ्याने अनुज्ञेय असलेली रक्कम रू.71,204/-च्या 90% रक्कम रू.64,084/- (चौसष्ट हजार चौऱ्यांऐंशी फक्त) असे रू.65,136/- + रू.64,084/- = रू.1,29,220/- या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 30 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ई व फ) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वार्ड क्र.79 मो.मुकुंदवाडी येथील सर्वे नं.-17, 22, 23, 26 येथील खेळाच्या मैदानाचा विकास करणे (अं.प.रक्कम रू.95,85,441/-) या कामाचे अंदाजपत्रक दि.20/6/2012 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.796 नुसार अं.प. रक्कम रू.95,85,441/- ला मंजुरी मिळालेली आहे. या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या. निविदा व निवदा दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | मे.आर.के.कंस्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 10.99% कमी |
| 2 | ड्रिमलँड कंस्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 7.19% कमी |
| 3 | ए.एस.कंस्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 15.8% जास्त |

प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा आर.के.कंस्ट्रक्शन यांची असून त्यांचा निविदा दर हा अं.प. दरापेक्षा 10.99% कमी असा आहे.

औरंगाबाद शहरात रस्ता रूंदीकरणाचे कामास उपलब्ध झालेले debris हे खेळाच्या मैदानात असलेले खड्डे भरण्यासाठी वापरण्यात येणार आहे. सदर debris मुळे अंदाजे 80% एवढे खड्डे महानगरपालिकेच्या यंत्रणेमार्फत भरण्यात येईल त्यामुळे एकंदरीत खर्चात अंदाजे रू.11,50,000/- एवढी बचत होईल व सदर कामावर एकुण रू.79,78,991/- एवढा खर्च होईल. तरी मे.आर.के. कंस्ट्रक्शन यांची अ.प. दरापेक्षा 10.99% कमी दराची निविदा स्वीकृती बाबत पुढील निर्णयास्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.79 मो.मुकुंदवाडी येथील सर्वे नं.-17, 22, 23, 26 येथील खेळाच्या मैदानाचा विकास करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.99% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 31 :</u>

मो.पैठणगेट येथील सादीया मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील मीर सलामी हॉल मधील रिक्त जागा शहर वाहतुक शाखा कार्यालयास मिळणेसाठी सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा औरंगाबाद शहर यांनी विनंती अर्ज करून मागणी केली आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या व वाहनसंख्या यामुळे पैठणगेट, गुलमंडी, शहागंज या भागात नेहमी गर्दी होत असते, सध्या शहर वाहतुक शाखेचे कार्यालय पीर बाजार, उस्मानपुरा येथे आहे. वाहतुक शाखेचे कार्यालय हे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणे आवश्यक आहे. असे नमुद करून मागणी केली आहे. शहर वाहतुक शाखेचे कार्यालय या दृष्टीने सदर जागा योग्य ठरते.

लग्न समारंभासाठी वापरण्यात येणारा सदर हॉल आता तेथे महानगरपालिका शाळा स्थलांतरीत होणार असल्याने त्यातील रिक्त राहणारा एक हॉल उक्त मागणी प्रमाणे वाहतुक शाखा कार्यालयासाठी पोलीस विभागास भडेपट्ट्यावर देण्यास हरकत नाही. सदर हॉलचे क्षेत्र 280 चौ.मी. एवढे असून या करीता भाडे रक्कम रू.25500/- प्रतिमाह होते.

वाहतुक शाखेचे वर नमुद कारणाने केलेली मागणी व वाहतुक समस्या निवारणाचे दृष्टीने मध्यवर्ती भागात कार्यालय असणे आवश्यक ठरत असल्याने शहरातील वाहतुक समस्या निवारणाचे दृष्टीने व नागरीकांचा होणारा त्रास टाळणेसह वाहतुक नियंत्रण, वाहतुक व्यवस्थापनाच्या सुलभतेसाठीच्या महानगरपालिका व पोलीस विभाग वाहतुक शाखा संयुक्त कार्यवाहीचा एक भाग म्हणुन उक्त रिक्त जागेचा शहर वाहतुक शाखा पोलीस विभागास ताबा दिला आहे. करीता वर नमुद

जागा रू.25,500/- प्रतिमाह भाडे दराने पाच वर्षाचे कालावधी करीता भाडेपट्ट्यावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.पैठणगेट येथील सादीया मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील मीर सलामी हॉल मधील रिक्त जागा शहर वाहतुक शाखा कार्यालयास मिळणेसाठी सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा औरंगाबाद शहर यांनी मागणी केल्यानुसार सदर जागा रू.25,500/- प्रतिमाह भाडे दराने पाच वर्षाचे कालावधी करीता भाडेपट्ट्यावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 32 :

औरंगाबाद शहरातील वाढती वाहन संख्या व त्या तुलनेत वाहनतळ / पार्कींग सुविधांचा अभाव यामुळे शहरातील रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या वाहनामुळे, अनियंत्रित पार्कींगमुळे वाहनांच्या रहदारीस होणारा अडथळा व त्यासंबंधाने निर्माण होणाऱ्या समस्या याबाबतच्या प्राप्त तक्रारी यासंबंधाने पोलीस विभाग (शहर वाहतुक शाखा) यांचे सहाय्याने या समस्या निवारणाचे कार्यवाहीचे दृष्टीने शहरातील अशा उपलब्ध जागा व रस्ता रूंदीच्या जागा इत्यादीची वाहतुक पोलीस अधिकारी समवेत संयुक्त पाहणी करून जागा निश्चित करण्यात आल्या. याप्रमाणे वाहनतळ पार्कींग करीताच्या जागा खालीलप्रमाणे :-

1. सादीया मार्केट, पैठणगेट -
2. नागेश्वरवाडी -
3. निरालाबाजार रस्ता -
4. सिटी प्राईड -
5. संत एकनाथ रंग मंदिर लगत -
6. गुलमंडी -
7. दिल्लीगेट बाहेरील रस्ता -
8. सेव्हन हिल ते सुतगिरणी रस्ता -
9. गजानन महाराज मंदिर ते जयभवानीगर रस्ता -
10. एन-6, स्मशानभूमी लगत -

सदर जागा पार्कींग करीता वापरात आणुन शहरातील पार्कींग / रहदारी समस्यांवर रस्त्यावर होणाऱ्या पार्कींग इत्यादी नियंत्रण ठेवणेसाठी पाहणी वेळी उपस्थित सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा, औरंगाबाद शहर, शहर अभियंता, सहा.संचालक नगर रचना व वाहतुक पोलीस अधिकारी (वाहतूक शाखा) यांचेशी झालेल्या चर्चेनुसार शहरातील रहदारी व पार्कींग समस्या निवारणाच्या विविध कार्यवाहीमधील एक कार्यवाही ज्यामुळे शहरातील नागरीकांना त्वरीत परिणाम देता येईल, यादृष्टीने या योजनेस प्रायोगिक तत्वावर मिळणारा प्रतिसादर पाहण्यासाठी व त्याअनुषंगाने पुढील निविदा कार्यवाही करणे, दर निश्चितीसह सदर कार्यवाहीस मा.स्थायी समिती कार्योत्तर मंजुरी घेण्याच्या अधिन राहुन पार्कींग शुल्क वसुली रक्कमेच्या 75% रक्कम महानगरपालिकेस व 25% रक्कम वसुली कर्त्यास देण्याचे प्रायोगिक तत्वावर सदर योजना अंमलात आणणेच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला व त्यासाठी खालीलप्रमाणे दर निश्चित केले आहेत.

1. सायकल - रू. 2/-
2. मोटर सायकल - रू. 5/- (उक्त दर सहा तासाच्या कालावधीसाठी)
3. चार चाकी वाहन - रू. 10/-
4. जड वाहन-बस व ट्रक - रू. 50/-

स्थानिक वर्तमानपत्रात आलेल्या वृत्त / बातमी आधारे प्राप्त अर्जानुसार खालीलप्रमाणे नमुद संबंधीतांना उक्त दराने पार्कींग शुल्क आकारणी करीता वसुली कर्ता म्हणुन तीन महिन्याचे कालावधी / पुढील आदेशापर्यंत नियुक्त करण्यात आले आहे.

1. सादीया मार्केट, पैठणगेट - श्री.बालजिसिंग ठाकुर
2. नागेश्वरवाडी - श्री.राजेंद्र स्नेही
3. निरालाबाजार रस्ता - श्री.संदीप कुंटे
4. सिटी प्राईड - श्री.अंकुश काळदाते
5. संत एकनाथ रंग मंदिर लगत - श्री.संतोष खरात
6. गुलमंडी - श्री.आतिष जोजारे
7. दिल्लीगेट बाहेरील रस्ता - श्री.विजय शेषराव पाटील
8. सेव्हन हिल ते सुतगिरणी रस्ता - श्री.पुनमचंद मेघावाले
9. गजानन महाराज मंदिर ते जयभवानीगर रस्ता - श्री.रूपचंद गोरक्षक
10. एन-6, स्मशानभूमी लगत - श्री.गोविंद प्रतिष्ठाण

करीता वरीलप्रमाणे वाहनतळ निश्चिती दर निश्चित व तात्पुरत्या कालावधी करीता नियुक्त वसुली कर्ताच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर याबाबत प्राप्त सूचना सुधारणा इत्यादी विचारात घेऊन दराबाबत तसेच याशिवाय आणखी जागा निश्चिती याबाबत विचार करून कार्यवाही करण्यात येईल.

संवाद :

श्री.रेणुकादास वैद्य : ट्रायल बेसीसवर पार्कींगची सोय उपलब्ध करून देत आहे. शहरात पार्कींगसाठी जागा उपलब्ध करून देऊन नागरीकांसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्यात येते. काही चुकीच्या रूढी,परंपरा या ठिकाणी रूढ होऊ नये हि जबाबदारी प्रशासनाची,मा.सभापती यांची आहे. एन-6 येथे स्मशानभुमी आहे अत्यंविधीसाठी येणाऱ्या नागरीकांकडुन पार्कींगफिस आकारणी करणे योग्य होणार नाही. इतर ठिकाणी पार्कींगसाठी परवानगी देण्यास माझी काही हरकत नाही परंतु एन-6 येथुन पार्कींगची आकारणी कसल्याही परिस्थित करू नये.

श्री.नारायण कुचे :अत्यंविधीसाठी येणाऱ्या नागरीकांकडुन वसुली करणे योग्य नाही.

श्री.बाळासाहेब मुंडे :शहरातील मोठमोठे मॉल, हॉस्पीटल येथुन पार्कींगद्वारे नागरीकांकडुन रक्कम वसुली केली जाते. हे योग्य आहे का? हॉस्पीटल येथे मी स्वत: गेलो असता माझ्याकडुन पार्कींग फिस आकारणी केली आहे.

मा.सभापती :महत्वाचा विषय आहे. परवानगी देत असतांना पार्कींग सक्तीचे केलेले असते. वसुली करणे चुकीची पध्दत आहे. बीपीएमसी ॲक्टमध्ये त्या संदर्भात काही नियम आहे का?

श्री.समीर राजूरकर :मा.आयुक्तांचे अभिनंदन, पार्कींगचे दोन टप्पे करण्यात यावे. एक चारही बाजुंनी बंद असलेली पार्कींग आणि एक रोडवरची पार्कींग. निराला बाजार येथील दुकानदारांनी पाठीमागे पार्कींग दाखविली आहे. तीन आऊटलेट सोडलेले आहे. रोडवर ज्या वाहने लावले जातात त्याचे आज काही वाटणार नाही. परंतु भविष्यात याचा भस्मासुर होणार आहे. निराला बाजार येथे पार्कींगचा जो पट्टा मारलेला आहे तो बरोबर नाही. दुकानांच्या पाठीमागे पार्कींग असतांना समोर पट्टा मारणे योग्य नाही. रोड पार्कींग संदर्भात प्रशासनाने समिक्षा करणे आवश्यक आहे.

मा.सभापती :निराला बाजार येथे मागच्या बाजुला पार्कींग दिलेली आहे. समोरच्या

बाजुला सोय दिलेली आहे. पार्कीगसाठी लेवल करून नागरीकांना वाहने लावण्यासाठी सोय उपलब्ध करून देण्यात यावी.

श्री.प्राजक्ता राजपुत :पार्कीगच्या जागेसाठी प्रशासनाने निविदा मागविण्यात आल्या होत्या का?

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांनी त्यांचे अधिकारात केलेल्या आहेत.

मा.सभापती :ताबडतोब काम सुरू करायचे होते त्या कारणाने ट्रायल बेसीसवर सुरू केले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलाचे उद्‌घाटन करण्यात आले आहे. संबधीत विभागाचे मा.मंत्री महोदय श्री.जयदत्त क्षिरसागर यांनी त्या ठिकाणी काही सूचना केल्या होत्या, उड्डाणपुलाच्या खालच्या भागामध्ये अतिक्रमण होऊ नये. अवैध धंदे होऊ नये यासाठी त्या जागेचे संरक्षण व्हावे. यासाठी त्या ठिकाणी माती टाकुन लॉन लावण्यात यावे. सौदर्यकरण करण्यात यावे.

मा.सभापती : ग्रीन बेल्ट त्या ठिकाणी तयार करण्यात यावी. क्राँक्रीटरोडच्या ठिकाणी पार्कीगची सुविधा उपलब्ध करणेबाबत विचार करण्यात यावा. एन-6 येथील स्मशानभुमी जवळ पार्कींग फिस आकारण्यात येवु नये. विषय मंजुर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद शहरातील वाढती वाहन संख्या व त्या तुलनेत वाहनतळ / पार्कीग सुविधांचा अभाव यामुळे शहरातील रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या वाहनामुळे, अनियंत्रित पार्कीगमुळे वाहनांच्या रहदारीस होणारा अडथळा व त्यासंबंधाने निर्माण होणाऱ्या समस्या याबाबतच्या प्राप्त तक्रारी यासंबंधाने पोलीस विभाग (शहर वाहतुक शाखा) यांचे सहाय्याने या समस्या निवारणाचे कार्यवाहीचे दृष्टीने शहरातील अशा उपलब्ध जागा व रस्ता रूंदीच्या जागा इत्यादीची वाहतुक पोलीस अधिकारी समवेत संयुक्त पाहणी करून खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या वाहनतळ पार्कीग करीता पार्कीग शुल्क वसुली रक्कमेच्या 75% रक्कम महानगरपालिकेस व 25% रक्कम वसुलीकर्त्यास देण्याचे प्रायोगिक तत्वावर सदर योजना अंमलात आणणेच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयास व त्यासाठी खालीलप्रमाणे दर निश्चित करणेस मंजुरी देण्यांत येते. तसेच त्या ठिकाणी ग्रीन बेल्ट तयार करण्यात यावी. क्राँक्रीटरोडच्या ठिकाणी पार्कीगची सुविधा उपलब्ध करणेबाबत विचार करण्यात यावा. व एन-6 येथील स्मशानभुमी जवळ पार्कींग फिस आकारण्यात येवु नये. यासह या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

1. सायकल - रू. 2/-
2. मोटर सायकल - रू. 5/- (उक्त दर सहा तासाच्या कालावधीसाठी)
3. चार चाकी वाहन - रू. 10/-
4. जड वाहन-बस व ट्रक - रू. 50/-

तसेच स्थानिक वर्तमानपत्रात आलेल्या वृत्त / बातमी आधारे प्राप्त अर्जानुसार खालीलप्रमाणे नमुद संबंधीतांना उक्त दराने पार्कीग शुल्क आकारणी करीता वसुली कर्ता म्हणुन तीन महिन्याचे कालावधीसाठी पुढील आदेशापर्यंत नियुक्त करण्यास मान्यता देण्यांत येते.

1. सादीया मार्केट, पैठणगेट - श्री.बालजिसिंग ठाकुर
2. नागेश्वरवाडी - श्री.राजेंद्र स्नेही
3. निरालाबाजार रस्ता - श्री.संदीप कुंटे
4. सिटी प्राईड - श्री.अंकुश काळदाते

| | | |
|---|---|---|
| 5. संत एकनाथ रंग मंदिर लगत | - | श्री.संतोष खरात |
| 6. गुलमंडी | - | श्री.आतिष जोजारे |
| 7. दिल्लीगेट बाहेरील रस्ता | - | श्री.विजय शेषराव पाटील |
| 8. सेव्हन हिल ते सुतगिरणी रस्ता | - | श्री.पुनमचंद मेघावाले |
| 9. गजानन महाराज मंदिर ते जयभवानीगर रस्ता | - | श्री.रूपचंद गोरक्षक |
| 10. एन-6, स्मशानभूमी लगत | - | श्री.गोविंद प्रतिष्ठाण |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद